श्री साइनाथ प्रसन्न.

# श्री साईलीला

## मासिक पुस्तक.

वर्ष ४ थें, भाद्रपद-मार्गशीर्ष शके १८४८, अंक ७ ते १०

नलिनीदलगत जलमतितरलम् । तद्वज्जीवनमतिशय चपलम् ॥



क्षणमपि सज्जनसंगतिरेका । भवति भवार्णव तरणे नौका ॥

श्री शंकराचार्य.

संपादकः—लक्ष्मण गणेश महाजनी.

प्रकाशकः—रामचंद्र आत्माराम तर्खड.

श्री साईलीला कचेरी ५ टर्नर रोड बांद्रे, बी. बी. रेल्वे.

## ...ुक्रमणिका.


स्फुट विषय. ... ... ... ... ... ४१३-५०८

महाराजांचे अनुभव ... ... ... ... ५२९-५६२

श्री साईसच्चरित ... ... ... ... ७२७-७५२


## वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी टपाल खर्चासह मनोआर्डरीनें आगाऊ रु. ३।=, व्ही. पी. नें रु. ३॥, फुटकळ अंक ।=, मागील अंकास शिल्लक असल्यास -॥-

## श्री साईसच्चरित.

या श्री साईलीला मासिकांत प्रसिद्ध होत असलेला हेमाडपंत विरचित श्री साईसच्चरित नामक ओवीबद्ध ग्रंथ आतां संपत आला असून लवकरच तो पुस्तकरूपानें बांधवून श्री साईलीला ऑफिसांत विक्रीस ठेवण्यांत येणार आहे. या सबंध ग्रंथाचीं पृष्ठें अजमासें ८०० वर होतील व यांत आरंभापासून अखेरपर्यंत प्रसिद्ध झालेले व होणारे सर्व फोटो व देखावे हेही प्रसिद्ध होतील. ग्रंथाची किंमत ३ रु. ठेविली जाईल. सोबत छापील कार्ड आहे त्यावर सही होऊन परत येतांच तो पाठविणाराचें नांव व पत्ता श्री साईलीला ऑफिसांत नोंदला जाईल. आज फक्त ग्राहक होऊं इच्छिणारांनीं या पत्त्यावर आपलीं नांवें व पत्ते नोंदवावेत. पुरेसे ग्राहक होतांच पुस्तकें बांधवून व्ही. पी. नें रवाना केलीं जातील.

गोविंद रघुनाथ दाभोळकर.

५ सेंट मार्टिन्स रोड ( मुंबईनजीक ) वांद्रें.

ता. क. पुस्तकविक्रीचें होणारें उत्पन्न श्री शिर्डी कायम-फंडांत जमा होईल.

---

या जोड अंकांत २२ पृष्ठें कमी आहेत, तीं पुढील अंकीं देण्यांत येतील.

## पद ( चाल लावणी )

( ह. भ. प. दासगणुकृत )

तूं पूर्ण ब्रह्म सुखधाम जगत् सोयरा ॥
गुरुराया हो ! या सोडवि भवसागरा ॥ धृ० ॥

गमविलें वृथा मी आयु अतां उमगलें ॥
गुरुराया हो ! तीं तारक तव पाउलें ॥
तूं साई आमुची माई आम्ही लेंकरें ॥
गुरुराया हो ! मग दूर धरिसि कां बरें ? ॥
किति प्रपंच खटपट करूं हाव किति धरूं ॥
गुरुराया हो ! का सांग अशा मधि मरूं ॥
मी हीन दीन अज्ञान, सत्य ना कळे ॥
गुरुराया हो ! मन विषयीं रमलें खुळें ॥
ह्मणि कृतार्थ मजला करी रोष ना धरी ॥
गुरुराया हो ! मी पापी परि उद्धरीं ॥
भडकल्या अग्नि ये मरण तृणाला जसें ॥
गुरुराया हो ! मम दोष जळावे तसे ॥
हुंदाडि वासरूं कास पयास्तव जरी ॥
गुरुराया हो ! कां गाय रुसे त्यावरी ॥
गणुदास बसुन हा दूर जोडितो करा ॥
गुरुराया हो ! या हरण करावें दरा ॥ तूं पूर्ण ब्रह्म० ॥

श्री सद्गुरू साईनाथायनमः ।

# साईनाथ प्रार्थना.

( दिगंबर शंकर भगवान. )

( शिखरिणी. )

प्रभो साईनाथा, अनुपम असे ही तव कृती ।
तुझी लीला देवा सकल-जनताश्चर्य-जनिती ॥
जगद्वंद्या साई, चरण-कमलीं मी नमितसें ।
मला द्यावी स्फूर्ती गुणचरित गायांसि सुरसें ॥ १ ॥

दयासिंधो साई, बहुत अपराधी जरि असें ।
क्षमा बालासी या करुनि सुखसोयें जननिसें ॥
असें पापी मोठा म्हणुनि न ढळोचि तव दया ।
कशी माता त्यागी स्व-सुत अपराधी म्हणुनियां ॥ २ ॥

तुझे पायीं देवा निशिदिनिं बसावें अमरसें ।
भ्रमावें, गुंजावें प्रभु तव पदाब्जीं भ्रमरसें ॥
सुखानें ऐकावें तव सुरस बोधां सुधरसें[१] ।
सुधा ती ही देवा विरसचि अशा उत्तम रसें ॥ ३ ॥

प्रभो दीनानाथा, जरि बहुत पापी कुमति मा ।
तरी होवो साई मजवरि कृपा ही, तुज नमीं ॥

१ अमृतासारखा गोड बोध.

न होवो देवेशा भव-उदधि-मध्यें बुडवणी ।
असे या दीनाची चरण-कमलीं ही विनवणी ॥ ४ ॥

जरी या मी मोहे, क्षणिक सुखभोगीं मन रमें ।
धनादी मोहातें प्रभु सतत मन्मानस रमें ॥
अशा या मूढाचा विसर न पडो, हीच विनती ।
प्रभो मातें द्यावी स्व-पद-भजनीं सुस्थिर मती ॥ ५ ॥

## ॐ नमो भगवते श्री सद्गुरुसाईनाथाय

श्र ाईनाथ पुण्यतिथि, विजयादशमी, शके १८४८ मुक्काम बडोदें बकूल बंगला.

### —सहजानंदः—

### साकी वृत्त

आनंदाचें स्थान कोणतें, त्याचा विचार आतां । शास्त्राधारें करूनिय तो अर्पूं साईनाथा । उमज सत्य जीवा । हृदयीं तुझ्याचि सुखठेवा ॥ १ ॥
अखिल जिवांची सारी खटपट, नित्यानंदासाठीं । तथापि त्याची समाधिविण, ती, कोणां न पडे गांठी । उमज सत्य जीवा । हृदयीं तुझ्याचि सुखठेवा ॥२॥
सर्व जिवांना निद्रा, नित्यचि चिदानंद तो देते । परि त्या समयीं त्याचें कोणा कदापि ज्ञान न होतें । उमज सत्य जीवा । हृदयीं तुझ्याचि सुखठेवा ॥ ३ ॥
निद्रावस्थेमाजीं लाभे, जें सुख त्याचें तुजला । निद्रांतीं तें स्मरण होतसें आहे ठावें मजला । उमज सत्य जीवा । हृदयीं तुझ्याचि सुखठेवा ॥ ४ ॥
विषयांतिल जें श्रेष्ठ गमे सुख, त्याविण ही बहु जातो । काळ, परी त्या निद्रेविणरे प्राण नकोसा होतो । काय सांगुं जीवा । सहजावस्था सुखठेवा ॥ ५ ॥
अखंड सहजानंदा विसरुनि, विषयांवरि मन जातें । विषयानंदीं तदंश लाभे, हें

समजोनि न येतें । किती वदूं जीवा, । तव हृदयीं रे सुखठेवा ॥ ६ ॥
सहजानंदाची महती ती, गेल्याविण नुमजे। जैसें मुरुदेशीं जें जावें, तें
तो याची उमजे। काय वदूं जीवा तुज अंतरिं रे सुखठेवा ॥ ७ ॥
वृश्चिकदंशें विव्हळ होतां, निजानंद मग तुजला। विषय कोणता सुखदायक तो,
तें तूं सांगें मजला । उमज त्वरें जीवा ॥ बाह्य नाहिं रे सुखठेवा ॥ ८ ॥
साखर निजगोडी ती दावी सदा, तेवि असतें। गुणरूपें सुख विषयांमध्यें,
तरि त्या कोणि न त्यजते । मंदबुद्धि जीवा । विषयीं नच रे सुखठेवा ॥ ९ ॥
सहजानंदा तुझिया हृदयीं, स्थानचि नसेल जेव्हां । स्वर्गीयहि ते विषय वाटती
विषवत् त्याज्यचि तेव्हां । अंतरिंचा जीवा । नको गमावूं सुखठेवा ॥ १० ॥
विभक्त सच्चिन्मय आनंदापासुनि हृदयस्थाच्या । होतां जीवा सुखलाभाच्या
गोष्टी मग त्या कैच्या । जपी नित्य जीवा । तूं अंतरिंचा सुखठेवा ॥ ११ ॥
विषयीं भासे सुखबिंदू जो, उगम तयाचा आहे । सहजानंदीं तोचि सिंधु रे
विचार करुनी पाहे । उमज उमज भाई । विषयीं मुळींच सुख नाहीं ॥१२॥
विषय जरी सुखदायक असते, तरि कां तरतम भावें। सुख न मिळावें त्यापासुनि
परि सतीस हें नच ठावें। गौण साधनांचीं । फळेंहि होति गौण साचीं ॥१३॥
कुरूप निजपति गुणहीन जरी, निःसीमचि तो असला ॥ तरी सतीतें तत्संगाविण
सुखाभास तो कसला । ऐसें कां व्हावें । प्राण्या अंतरीं विवरावें ॥ १४ ॥
सच्छीलातें तैशी सुखदा, फक्त स्वभार्या वाटे । गुणहीनहि जरि असली, तरि तो
परांगने नच भेटे । किती सांगुं जीवा । बाह्य नसे रे सुखठेवा ॥ १५ ॥ स्वप-
तीवाचुनि भोगेच्छा कधिं अन्यीं नोहे सतितें । रूपगुणास्तव कधीं न पाही ती
अन्येच्या पतितें। सुखसाधन कांहीं । कदापि विषयीं तें नाहीं ॥ १६ ॥
जारजारिणी यांसि पाहतां, रूप गुणांवरि कांहीं ॥ प्रेम तयांचें अवलंबुनि तें
प्रायः राहत नाहीं । सुख अंतरिं सारें । विषयीं कदापि नच बारे ॥ १७ ॥
विषयीं सुख तें असतें, तरि मग उत्तम साधन त्याज्य । किमर्थ व्हावें ? न घेई
तैला जया मिळतसे आज्य ! । विषयीं सुख नाहीं । न येथ संशय हो कांहीं॥१८॥

इष्टाच्या मृत्युने कोणां कदापि दुःख न होई । त्याची वार्ता कानीं येतां सुख तें विलया जाई । मंनोनाश बारे झाल्या उरतें सुख सारे ॥ १९ ॥ तेवि कृपण तो निज द्रव्याचा भोग कदापि न घेई । तरी तयातें नुसतें पाहुनि आनंदी तो होई । विषयीं सुख कैचें । सदा तें मानसिक साचें ॥ २० ॥ जड विषयीं तें देणें घेणें आनंदाचें कैसें। सुबुद्धिमंत प्राण्यासहि हो प्रायःनुमजे ऐसें। हरिमाया मोठी । लागे सर्वांच्यां पाठीं ॥ २१ ॥ सुख विषयींचें ह्यापरि आहे सकलहि कल्पित नान्य । ऐसें उमजुनि विषयसंग ता त्यागुनि व्हावें धन्य । उमज सख्या कांहीं । निजहृदयीं तें सुख पाहीं ॥ २२॥ अचिंत्य विषयाभासा पाहुनि हरिच्या ऐश्वर्याची । पूर्ण कल्पना करून मग ती कास धरावी त्याची। पंच विषय जीवा । हरूनि नेती सुखठेवा ॥ २३ ॥ हरिच्या मायाशक्तीचा उपयोग अन्य तो नाहीं । हरितें हृदयीं दृढ धरिल्यावरि विश्वउपेक्षाचि होई ।जडिं तें सुख नाहीं । चित्ता राही हरिपायीं ॥ २४ ॥ साईरूपें अनन्यभावें हरि निज हृदयीं मान्य । वसतो त्याच्या दृढ योगानें नीलकंठ हा धन्य । जय सद्गुरुराया । आवरि आपुली तूं माया ॥ २५ ॥

**पद** चाल ( केशव करणी अघडितलीला )

शरीर क्षणिकचि क्षणिकचि मन तें प्राण इंद्रियें दहा । दाविती नित्यानच तीं पहा ॥ १ ॥ शाश्वत देवा ह्यांच्या द्वारें कैसा शोधूं तुला ॥ फसविती सदोदित सारीं मला ॥ २ ॥ जड हीं अवघीं विश्वहि जड तें चिच्छक्ती नच तिथें ॥ मिळे ती कैशी दृश्यें इथें ॥ ३ ॥ मायिक दृश्यीं भासे परि ती तद्भिन्नचि तत्वता ॥ विवेकें उमजे, नच अन्यथा ॥ ४ ॥ जडा माजिं त्या आनंदाला ठाव किमपिही नसे[1] तत्वता सच्चिन्मय जो असे ॥ ५ ॥ चिदानंद तो अभिन्न आहे आत्मीं त्यीं वसे । जडत्वीं किमपिहि नच तो असे ॥ ६ ॥

---

१ मनची निर्व्यापारता

सूर्य तमातें तम सूर्यातें भेटत नाहीं कदा । चिज्जडें विभक्त तैशीं सदा ॥७॥ पयनीरापरि मिश्र होऊनी चिज्जड ग्रंथी वसे । सकलां जड सत्यासम दिसे॥८॥ अखिल विश्व हें क्षणोक्षणीं कीं सततचि चंचल असे। स्थिरचिरा तेथें ठा.वचि नसे ॥९॥ समत्व दिसतें प्रवाह योगें दृष्टिदोष तो असे । अनेकीं ईश्वर कैसा दिसे ॥१॥ चंचल नश्वर भिन्न जगाच्या ज्ञानें ईश न दिसे । स्वरूपें तद्भिन्नचि जो असे ॥११॥ जडांश त्यागें चिदंश घेतां चिन्मयता लाभते । मग जड माया नच क्षोभते ॥१२॥ जीवेशांचें ऐक्य उमजल्या जड विल्या जातसे। अनुभवा ब्रह्मचि मग येतसे ॥ १३ ॥ जीवशिवांचें ऐक्य नसे तों मायिक सर्वहि असे ॥ जगीं जाडयाविण कांहीं नसे ॥ १४ ॥ कार्यहेतु जे पंचक (१) तें जड त्यांचीं कार्यें तशीं । आत्म्यातें तीं दाविति कशीं ॥ १५ ॥ बुद्धिहि (२) अध्यात्मिक नोहे जों तों ती त्यागिल कशी । जडत्वा भिन्न नसे जें तिशीं॥१६॥ चिदाभास हा निजरूपातें त्यागुनि आत्मीं विरे । तरिच कीं प्रपंच सगळा सरे ॥ १७ ॥ विल्या चिज्जडग्रंथि जावया विराग ( ३ ) लागे खरा । तयाविण मार्ग नसे दूसरा ॥ १८ ॥ विवेक अथवा ( ४ ) भक्तियोग ह्या दोंविण साधन नसे । जयानें श्रीहरि हृदयीं ( ५ ) दिसे ॥ १९ ॥ द्विविया मार्गीं सुलभ ( ६ ) भक्ति ती साध्यहि सर्वां असे । जियेनें ईश्वर वश होतसे ॥२०॥ क्रमाक्रमानें निजस्वरूपीं मुमुक्षुतें न्यावया । ईश्वर योजी मार्गद्वया ( ४ ) ॥२१॥ नजपद भक्तां उदार द्याया ईश सर्वदा ( ७ ) असे । कृपणता तदितर ठायीं वसे ॥ २२ ॥ ऐसा करुणासागर हरि तो जीवांहृदयीं ( ५ ) वसे । तयाविण तारक दुसरा ( ८ ) नसे ॥ २३ ॥ संतस्वरूपें ( ९ ) जगीं प्रगटुनी भक्तांतें उद्धरी । ऐसें वदते तद्वैखरी ॥ २४ ॥ निज हृदयींचीं खूणगांठ ( १० ) ती दावी भक्तां सुखें । अर्जुनांसम जे नच पारखे ॥ २५ ॥ ब्रह्मरूप गुरु निज भक्तांतें नेई निष्क्रियपदा (११) प्रपंचा न शिवे मग तो कदा ॥ २६ ॥ मायाकार्यचि (१२) प्रपंच सारा मायिकत्व (१२) ईश्वरीं । मुक्तां स्थान दोहोंच्या शिरीं (१३) ॥ २७ ॥ गुरुकृपेनें ब्रह्मात्मैक्यचि ( १३ ) निज हृदयीं जें मुरे ।

मुक्तां प्रपंच तेन्हां सरे ॥ २८ ॥ आद्यस्वरूप ईशाचें जें निष्क्रिय होउनि वसे ।
तेथें मुक्तां वस्ती असे ॥ २९ ॥ ईशाचीं जी मायाशक्ति तिचे होत ते धनी ।
भिन्न न ईश तयांपासुनी ॥ ३० ॥ ऐशा भाग्या देई जो गुरु तत्पदकमलीं
रत । व्हावें हेंचि हरी सांगत (९) ॥ ३१ ॥ नीळकंठ: हा ग्रास्तव वांच्छी
साइपदीं रति सदा, अभक्तिच आहे सकलापदा ॥ ३२ ॥

॥ ॐ तत्सच्छ्री सद्गुरु साइनाथ पदकमलार्पणमस्तु ॥

## श्रीमद्भगवद्गीता:—

(१) १८. १४
(२) १३. ५-६
(३) ६. ३५
(४) ३. २
(५) १३. २
(६) ५. ६
(७) ९. ३४
(८) १८. ६५–६६
(९) ४. ३४
(१०) १८. ६४
(११) ४. ३३
(१२) १४. ३
(१३) १८. ४९–५५.

# ॥सच्चिदानंद सद्‌गुरु श्रीसमर्थ श्रीसाईनाथाय नमः॥

## साकी वृत्त

**आनंदाचा** विचार झाला, आतां **सच्चिन्मयता।** कैशी आहे विवेक त्याचा, करुं हो पुढती पुरता। मना सावधान। ठेवी सदा **आत्मभान** ॥ १ ॥ सकल जिवांच्या ठायीं **नित्यचि, चिदात्मता** ती वसते। जागृत्स्वप्नीं **मनीं** दिसतसे, निद्रेमाजिंही असते। मन तेंव्हां नाहीं। कोण तिला हो मग पाही ॥ २ ॥ **चिच्छक्तीला** ज्ञान स्वतःचें, म्हणतां दोषचि येई। स्वस्कंधावरि आरोहण तें, असंभाव्य हो होई। मनावीण तीतें। कोणी जाणूं नच शकतें ॥ ३ ॥ **आत्मप्रकाशें** सुषुप्तिअंतीं, मनचि जाणतें सुख तें। आत्मस्वरूपाहूनि भिन्न जें, सुषुप्तिकालीं नसतें। मना सावधान। ठेवी सदा **आत्मभान** ॥४ ॥ तिन्ही अवस्थामाजीं ऐशी, **चिच्छक्तिहि** ती वसते। मनद्वारें ती भाव आपुला, प्रकट करूनी असते। मना सावधान। ठेवी सदा **आत्मभान** ॥ ५ ॥ **चिच्छक्तिहि** ती तिन्ही अवस्थां, माजीं आहे ऐसें। म्हणतां तिजला **सत्ता** नाहीं, ऐसें होईल **कैसें।** जग मिथ्या आहे। तैशी **चिच्छक्ति** नोहे ॥ ६ ॥ भौतिक जड तें जरि निजरूपें, चंचल सततचि राहे। तरि विश्वीं ह्या पूर्ण नाश तो, कधीं कशाचा नोहे। शास्त्र वदे ऐसें। तें **चिच्छक्तिच** जाणतसे ॥ ७ ॥ चंचल जड जें तेंहि जगीं ह्या, जरि **सत्तात्मक** आहे। सर्वसाक्षिणी **चिच्छक्तिहि** ती, मग तैशी कां नोहे। बुद्धिमंत जीवा। पाही नित्य **आत्मभावा** ॥ ८ ॥ उपाधि भिन्नचि जरि जीवांच्या, तरि **चिच्छक्ति** नोहे। उपाधि भेदें भिन्न कदा ती, **आनंदात्मक** राहे। उमज घेइ जीवा। विसरूं नको **आत्मभावा** ॥ ९ ॥ रक्त मांस हीं शरीर भेदें, नरासि जेविं न भिन्न। सर्वां देहीं **चिच्छक्तिहि** ती, राहे तशिंच अभिन्न। मना सावधान। सोडूं नको **आत्मभान** ॥ १० ॥ गोमाता त्या असंख्य असुनी।

---

मनाची निर्व्यापारता, म्हणजे आत्मपराधीनता.

दुग्ध तयाचें पाही । तसे भिन्न रे चिच्छक्तिहि ती, सदा अभिन्नची राहे । मिळवीं जीवा । नाहीं केवळ सुखठेवा ॥ ११ ॥ ईशाच्या इच्छाशक्तीनें, जगच्चक्र हें हाले । तैसें जीवाच्याचि मनानें, त्याचें शरीर चाले । पडूं नको फंदीं ॥ किंवा विषयांच्या छंदीं ॥ १२ ॥ ईशाची जी मायाशक्ती, ती आधीन त्याच्या । तैसें आत्मज्ञानें मनही, आधिन होय जिवाच्या । मनोनाश* होतां । लाभे ईशाची समता ॥ १३ ॥ शारीरेंद्रियें प्राण आणि मन, मायामय हीं सारीं । तीं मनराजा मोहुनि नेतीं, अज्ञानाच्या द्वारीं । नरकाचीं द्वारें । नव्हतीं अन्य मनाबारे ॥ १४ ॥ ह्यांच्यासंगें सर्वात्मकता, मानासि सोडुनि जाई । तदनंतर तो अहंभाव त्या, सदाचि घेरुनि राही । मूळ पातकाचें । अहंकारीच असे साचें ॥ १५ ॥ सदभिमान तो सोडुनियां मन, मिथ्याभिमान धरितें । त्याच्यायोगें मिथ्यासह तें, नष्टत्वातें वरितें । पतन होत ऐसें । मनासि समजेना कैसें ॥१६॥ उत्पत्ति स्थिति लया पावते, जगरूपी ही माया । तेवि मनातें देहांतर तें प्राप्त होतसे राया । आत्मा मुक्त सदा । नाहीं तया द्वैतबाधा ॥१७॥ सूक्ष्मत्वें मन अति निर्मल तें, त्यावीण दुसरीं सारीं ॥ जडें प्रकाशा गृहण कराया, अपात्र असतीं भारी ॥ बंधमोक्ष पाही ॥ मनारे वसति तुजठायीं ॥ १८ ॥ आत्मस्वरूपा शरण जाउनी, जैं तू तन्मय होसी ॥ तैंचि मना रे जडत्व त्यागें, चिद्रूपा तूं मिळसी॥मना सावधान ॥ विसरूं नको आत्मभान ॥ १९ ॥ विषय इंद्रियें त्रिगुणात्मक हीं, मायोद्भव रे सारीं ॥ त्यांचीं कर्में त्रिगुणीं अर्पुनि, राही ईशद्वारीं ॥ तरी मना मोक्ष ॥ मिळेल तुजला प्रत्यक्ष ॥ २० ॥ विश्वात्मा जो जीवात्म्याचें, तात्विक स्वरूप आहे ॥ त्याला सोडुनि मना तुलारे, जडीं रती कां साहे ॥ दुर्मार्गें जासी ॥ आत्मघातकी तूं होसी ॥ २१ ॥ नित्यमुक्त जो ईश असे तो, पुरुषोत्तम ह्या भावें । वसे सदा जीवाच्या हृदयीं, त्यासि कसें विसरावें । सर्वाधार हरी । मना तूं त्याचे पाय धरी ॥२२॥ ईश गुणाच्या अनुरोधानें, इंद्रियग्रामा ठेवी ? समता

* मनाची निर्व्यापारता

आणिक दया तयाची, सर्वांभूतीं दावी । हाचि मार्ग सोपा । नेइल क्षया सर्व पापा ॥ २३ ॥ सत्ता विश्वीं सार्वत्रिक ती, चिदात्मता ती जीवी । आनंदात्मक योगी असतो, हें समजुनि बा ठेवी । शरण हरिसि जासी । तरी तूं मना मुक्त होसी ॥ २४ ॥ विषयेंद्रिय संयोगें भ्रमसी; तेणें कष्टी होसी । त्या संगाचा त्याग झाल्यिा, सदासुखी तूं असती । मना बोध घेईं । राही सदा ईशपायीं ॥ २५ ॥ सत्‌वित् आनंदात्मक ठेवा, समीप तुझिया आहे विषयेंद्रिय संयोगासंगें, बहकसी तू बा पाहे । विषयसंग त्यागी । मना तूं होईं आत्मभोगी ॥ २६ ॥ साईकृपा स्फूर्तीनें मानसिं विचार जे जे आले । ते ते सारे साइस अर्पण, करुनि निळोबा बोले । जय साईनाथा । उद्धरी माझें मन तोता ॥ २७ ॥

### श्री सद्गुरु साईराजायनमः

सा. न. वि. वि. खालील मजकुरास आपल्या विबुधमान्य श्रीसाई-लीलेच्या एखादेअंकीं कृपेनें स्थल मिळावें अशी नम्रविनंति आहे.

श्री

## साईचरित्ररत्नकाराची

### अत्यल्प सामग्री

मंदाक्रांतावृत्तम्

क्वासौ श्रीमानतुलभगवान्साइ चिच्चक्रवर्ती ।
क्व श्री साई चरित जलधि र्दुस्तरोऽनंतपारः ।
क्व श्रीलीला गहन मधुरास्तस्य कल्लोलमालाः ।
क्वायं बालः प्रकृतविषये दीन शून्याधिकारः ॥ १ ॥

**अर्थ:-** ज्याची तुलना करतां येत नाहीं असा हा श्रीमान् ज्ञानसम्राट साइ परमात्मा कोणीकडे; ज्याला पार नाहीं व जो तरून जाण्यास अति कठीण असा (हा) श्रीसाइचरित्ररत्नाकर कुणीकडे, त्याच चरित्ररत्नाकराच्या अगाध व गोड अशा लीलारूपी लाटांच्या माळा कोणीकडे, व प्रकृत विषयामध्यें ज्याला कोणत्याहि प्रकारें अधिकार नाहीं असा हा गरीब विचारा बाळ कुणीकडे.

पृथ्वीवृत्तम्.

महालस विमूढ धीः पतितमंदभाग्योऽशुचिः ।
जडोऽपि यशसश्चिरं सुरचकस्य चार्थी तथा ।
तितीर्षरति दुस्तरं क्षततरेण गोहान्नि धिम् ।
गमिष्यति जनेष्वयं समुपहास्यतां बालकः ॥ २ ॥

**अर्थ:-** महा आळशी, अक्कलशून्य, पातकी, दुर्दैवी, अमंगल, व मठ्ठ असा जरी आहे तरी चतुर लेखकाचें यश निरंतर प्राप्त व्हावें अशी इच्छा बाळगणारा, व अज्ञानामुळें तरून जाण्यास भयंकर असा महासागर फुटक्या होडग्यानें तरून जाण्याची इच्छा करणारा हा बालक खरोखरच लोकांमध्यें फजिती मात्र पावेल.

## शिखरिणिवृत्तम्.

प्रबुध्यैतत्सम्यक् तदपि यतते लेखितुमिद ।
अहो धार्ष्ट्यं ! क्षीरोदधिशयन साईश चरितम् ।
शिशुः स्वच्छंदोऽयं तव, जननि, तच्छंदमखिलम् ।
ऋते त्वां मासाध्दुं, करुणखनि, कस्त्वोश्वर इह ॥ ३ ॥

अर्थः—( वरील ) हें ( सर्व गोष्टी ) बरोबर उत्तम प्रकारें माहीत असूनही हें पोरक्षीरसमुद्रावर शयन करणाऱ्या साई परमात्म्याचें चरित्र लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे. अहो हा केवढा फाजीलपणा ! हे साइमाते तुझें हें पोर फार हट्टी आहे. हे करुणेचे खाणी, तुझ्या वांचून या जगतांत त्याचा सर्व ( हट्ट, छंद ) नाद पुरविणारा दुसरा कोण समर्थ आहे ?

श्रीसाइलीलेच्या तिसरे वर्षाच्या ९ वे अंकांत २९३ पानापासून २९९ पानापर्यंत बाबांच्या चरित्ररत्नाकरा संबंधानें काय काय लिहितां येईल याबद्दल यथामती ७७ बाबींचें एक छोटेसें टिपण दिलें आहे. तेवढ्यानें बाबांच्या चरित्ररत्नाकरांत यथेच्छ अवगाहन करून, त्यांत बुडी मारून, त्याचा तळ गांठून त्यांतील अमूल्य रत्नें वर आणून तीं उत्कंठित वाचकांच्या हातीं देणें अशक्यच आहे. टिटवीनें आपल्या चिमुकल्या चोंचीनें अगाध व अफाट जलनिधीचें पाणी बाहेर फेंकून देऊन त्यास शुष्क करण्याच्या बालिश प्रयत्ना सारखाच हाही हास्यास्पद प्रयत्न आहे. तथापि बाबांची सेवा सर्वतोपरी जशी ज्यास आवडेल व साधेल तशी पण काया वाचामनेंकरून करणे प्रत्येक सद्गुरुप्रेमी भक्ताचें आद्य कर्तव्य आहे असें मला वाटतें. व प्रस्तुत प्रयत्न बाबांच्या सेवेच्या अनंत अंगापैकीं एक अत्यल्पांग आहे. खंडशः चरित्र लिहिणें अथवा चरित्रसामग्री तयार करणें हें सेवेचें प्रमुख किंवा प्रधान अंग होणार नाहीं. मी खंडशः अगर समग्र चरित्र लिहीत नाहीं. तो माझा अधिकार नाहीं. तथापि बाबांच्या चरित्रा करितां जितकी सामग्री जमा करतां येईल तितकी जमा करावी हाच या प्रयत्नाचा हेतु आहे. हाही प्रयत्न माझ्या मंदाधिकार कक्षेच्या बाहेरचा आहे. अद्यापही या प्रयत्नाकडे सुद्धां श्री साइलीलाप्रिय वाचकांचें लक्ष गेलेले दिसत नाहीं. त्यामुळें बाबांनीं मला हा प्रयत्न करण्याची प्रेरणा केलेली दिसते. माझ्यापेक्षां अनंत पटीनें लायक व चरित्रलेखनपटु लेखक जगांत व बाबांच्या निस्सीम असंख्य

भक्तमालिकेंत शेंकडों विद्वद्रत्नें निघतील. त्यापैकीं कोणींही बाबांच्या पुण्य-निर्याणां नंतर लागलीच हें मधुर कार्य हातीं घेतलें असतें तर तें निःसंशय या पूर्वी केव्हांच समाप्तही झालें असतें. व अद्यापही ते हातीं घेतील तर तें अल्पावधींत समाप्त होऊन विद्वज्जनमान्य होईल. परंतु बाबांची योजना व लीला कांहीं अजबच असते. ही गोष्ट सर्वश्रुतच आहे कीं आपल्या निर्याणानंतर आपल्या हिंदु-यवन भक्तांमध्यें आपल्या मानवी तनूस हिंदुमंदिरांत समाधि घ्यावी किंवा यवनांचे दर्ग्यांत कबर दाखवावी याबद्दल रणें माजूं नयेत म्हणून कोणासही मागमूस कळूं न देतां शिरडी सारख्या चिमुकल्या गांवांत, बाबांनीं ज्या नागपूरनिवासी कैलासवासी भक्तश्रेष्ठ कोटयाधीश अशा श्री० बापूसाहेब बुट्टी कडून, एक मनोहर टोलेजंग पाषाणमय एक लक्षापेक्षांही जास्त किंमतीचें भव्य मंदीर बांधवून घेतलें, त्याच पुण्यभक्ताकडून, आपल्या समाधीच्या नित्य नैमित्तिक खर्चासाठीं आणखीं एक लक्ष रुपयांची कायमची अव्याहत नेमणुक करून घेणें, अथवा या कार्यासाठीं एक लक्ष रुपयांचा कायमनिधि काढून ठेवण्यास त्यांस सांगणें, बाबांस मुळींच अशक्य नव्हतें. व बाबांनीं आज्ञा केली असती तर एक लक्षच काय पण दहा लक्ष रुपये सुद्धां बापूसाहेबांनीं कायम फंडा करितां निःसंशय काढून ठेविले असते. बाबा समाधिस्थ झाल्या-वर समाधी प्रीत्यर्थ नैमित्तिक खर्चा संबंधींची कायम व्यवस्था श्री० बापूसाहेब बुटी करणारही होते; परंतु अनेक कारणांमुळें तें कृत्य दिरंगाईवर पडलें व श्री० बापूसाहेबांचाही अकालीं अंत झाला. बाबांनीं तसें कां करून घेतलें नाहीं ! बाबांची लीला व भक्तवत्सलता विचित्र आहे हें वर सांगितलेंच आहे. त्यांनीं जर वर लिहिल्याप्रमाणें बापूसाहेबांकडून एक अथवा जास्त लक्ष रुपये या खर्चाकरतां निराळे काढून ठेवविले असते तर त्यांच्या यथाशक्ति सेवे करतां आमरण उत्सुक असलेलीं अथवा धडपड करणारीं आम्ही त्यांचीं अगणित लेंकरें या त्यांच्या द्रव्यनिधि समुच्चय सेवांगाला परांगमुख झालों असतों

आम्ही बेफिकीर व आळशी बनलों असतों. कर्तव्यविन्मुख झालों असतों. सर्वच भक्त बाबांचे. मग या खर्चाचा सर्वच बोजा एकाच भक्तावर कां? श्रीमंत भक्तांनीं आपल्या ऐपतीप्रमाणें मोठा उचलला तर गरीब भक्तांनी आपल्या ऐपतीप्रमाणें थोडा तरी उचलाच पाहिजे व बाबांची ह्या प्रकारची सेवा करण्यास सर्व लहान थोर. गरीब श्रीमंत, हिंदु यवन, खिश्चन पारशी भक्तांस संधी मिळावी म्हणून जशी श्री० बापूसाहेबांस बाबांनीं आज्ञा केली नाहीं तशीच भक्तमालिकेंतील लायक विद्वद्रत्नाकडून याहीपेक्षां दुसरी बहुमोल कार्यें करवून घेण्याचीं असल्यामुळें म्हणा अगर अन्यकारणामुळें म्हणा बाबांनीं चरित्रसामग्री समुच्चय करण्याची प्रेरणा मला केलेली दिसते. कांहींही असो ही प्रेरणा हें त्यांच्याच अमोल व पुण्यकृपेचें फळ होय.

असो. त्या ७७ बाबीपैकीं आज प्रथम बाबी संबंधीं दोन शब्द लिहिण्याचें योजिलें आहे.

## बाबांनीं श्री गोदावरी तीरावरच निवास कां केला:—

शार्दूलविक्रीडित.

कैलासेशजटा त्यजूनि भूवि या विश्वार्ति नाशावया ।
आली त्र्यंबकराज शैलशिखरीं अत्युच्च गंगालया ।
पश्चाद्विश्व मलाशनोद्भवमलध्वंसार्थ श्री गौतमी ।
ज्याच्या सन्निध पातली नति तया श्री साइपंत्सत्तमीं ॥ ४ ॥

हे गोदावरि गौतमि त्रिपथगे शर्वप्रिया सुंदरी ।
कंदर्पारिगलावतंस, धरि, तो तूंतें जटामंदिरीं ।
नाहीं पार त्वदीय भाग्यविधिला ना अंत ना त्या तुळा
साष्टांग प्रणती तती मम अशा हे वृद्ध गंगे तुला ॥ ५ ॥

श्री गोदावरी ही सर्व नद्यांमध्यें आद्यतम, पुण्यतम, श्रेष्ठ व पुराणतम सरिता आहे. हिच्या इतकी धन्य नदी त्रैलोक्यांत मिळणें कठीण. हिच्या ऐश्वर्याचें विस्तृत व रमणीय वर्णन विशेषेंकरून गोदावरी महात्म्य व सिंहस्थ महात्म्य यांत फार बहारीचें केलें आहे. हिची उत्पत्ति व हिचा मर्त्य लोकांवर येण्याचा कालही त्यांत दिला आहे. कोणत्याही पुराण वस्तूच्या उत्पत्तिबद्दल व कालाबद्दल विद्वज्जनांमध्यें नेहमींच वाद असतो. व तो वाद चार प्रमाणांपैकीं कोणत्या तरी एका प्रमाणानें मिटवावयाचा असतो. तीं प्रमाणें म्हणजे जगद्वंद्य, श्रुति, स्मृतिपुराणें व इतिहास. कांहीं अपवाद खेरीज करून सर्व वैदिक धर्माभिमानी हिंदु विद्वान वेद प्रमाण मानतात. स्मृतीहीं मानतात. स्मृती तर आमचे कायदेच होऊन बसले आहेत. उदाहरणार्थ हिंदु लॉ. पुराणें अलीकडे फारसे विद्वान मानीत नाहींत. इतिहास मानतात. परंतु इतिहासांतील पुष्कळ गोष्टीबद्दल एकवाक्यता होत नसल्यामुळें त्यांतही विद्वानांच्या मतांची ओढाताणच होत असते. इतिहास पुराणापेक्षां जास्त विश्वसनीय. कारण त्यांत प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलेल्या गोष्टींचें वर्णन केलेलें असतें व ते पुराणकालापेक्षां जास्त जुनेही नसतात. संस्कृतांत पुराणांनाच पुरातन इतिहास असें म्हणतात. व ही गोष्ट पुराण वाचकांस अपरिचित नाहीं. सिंहस्थ महात्म्यांतील पहिले अध्यायाच्या पहिले श्लोकाचा पहिलाच चरण पहा " श्रुणुतात प्रवक्ष्यामि इतिहासं पुरातनम् ". हेच इतिहास फार जुने झाले म्हणजे त्यांनाच पुराणें ही संज्ञा प्राप्त होते. सर्वत्र इतिहास निःपक्षपात बुद्धीनें व सत्याला धरून कोठें लिहिलेले असतात ? त्यांतही इतिहास लिहिणाराचा देश, जात, विद्वत्ता, त्याचे पूर्व ग्रह, त्याचें मनवैचित्र्य, त्याचे गुणावगुण, त्याचा समाजांतील दर्जा, त्याची त्या वेळची परिस्थिति, त्याचा स्वभाव त्याचें शील त्याचें लेखनचातुर्य त्याची ओजस्विता, त्याची प्रतिभा, लेख्य विषयाबद्दल त्याची आदर अथवा अनादर बुद्धि या सर्व गोष्टींचें थोडया बहुत प्रमाणानें प्रतिबिंब पडत असतें. तो सत्याभिमानी व निःपक्षपाती असल्यास त्याच्या लेखांतील बऱ्याच गोष्टी

श्वसनीय व निःपक्षपाती असूं शकतील. परंतु प्रत्येक शब्द विश्वसनीय असणें कठीणच. सत्य व निःपक्षपातीपणापेक्षां विषयाचें रुक्षत्व जाऊन तो मनोरंजक व चटकदार कसा होईल याकडेच बहुतेक इतिहासकारांचें लक्ष असतें. व हें मनुष्य स्वभावास अनुसरूनच आहे. व अशीच जर इतिहासाची स्थिति आहे तर विद्वज्जनांनीं आमच्या पुराणासच कां नाकें मुरडावीं? इतिहासांत काय किंवा पुराणांत काय थोडा तरीं अति शयोक्तीचा भाग असणारच परंतु त्या बरोबर त्यांत असलेल्या बहुतेक विश्वसनीय ग्राह्यांशाचा त्याग कां? आमचीं पुराणें केवळ इसाफ फेबल्स नव्हत. इसाफ फेबल्समध्यें जशा कावळा–चिमणीच्या गोष्टी सांगून नीतीचें प्रतिपादन केलें आहे, तसेंच आमच्या पुराणांतील सर्वच कथा आज अक्षरशः खऱ्या मानतां येत नसल्या तरी त्यापैकीं पुष्कळशा गोष्टींना वेदाचा व स्मृतींचा आधार मिळतो. आमच्या पूर्वजांची अशीच अद्वितीय युक्ती आहे कीं त्यांनीं आमच्या करतां सर्व धर्म, नीति, न्याय, सत्य तत्त्वें हीं नानाप्रकारच्या रम्य व सुंदर कवित्वरूपानीं शास्त्रांत व पुराणांत भरून ठेविलीं आहेत. पुराणें हीं वेदांच्या ( पुराण, न्याय, मीमांसा व धर्मशास्त्रें ) चार उपांगा पैकींच एक अंग आहेत. अज्ञान व प्राकृत जनांच्या चित्ताकर्षते करितां धर्म, न्याय, नीति व सत्य तत्त्वां बरोबरच अथवा हीं तत्वें जास्तच चटकदार व रमणीय दिसावींत म्हणून त्यांत भगवान् वेद व्यास, वाल्मिक, मार्कंडेय, आदि करून अद्वितीय योग्यतेच्या व विशाल बुद्धीच्या ऋषी पुराणिकांनीं कुशलतेनें ज्या कथा घातल्या आहेत त्या विश्वसनीय कां मानूं नयेत. व त्यांतील बहुमोल तत्वरत्नांची अवहेलना कां करावी? आज पर्यंत विद्वानांनीं या पुराणांची टवाळी करून, त्यांच्या मदतीनें समाजाची सुधारणा करून समाजास सन्मार्गाकडे लावण्याची निर्मल कामगिरी करून घेण्याचे ऐवजीं पुराणें म्हणजे एक भट भिक्षुकांच्या उदर भरण्याचें साधन अतएव तीं त्याज्य व कवडीमोल करून ठेविलीं होतीं. परंतु अलीकडे आधुनिक विद्वानापैकीं कांहीं विद्वद्रत्नांचें भारत

भागवतादि पुराणांचे अंतःकरण पूर्वक व परिश्रम पूर्वक परिशीलन करून पुराण महोदधींत अमूल्य तत्त्व रत्नें आहेत असें जगाच्या निदर्शनास आणून देण्याच्या उत्तमोत्तम कार्याकडे लक्ष वेधलें गेलें आहे ही फार समाधानाची गोष्ट आहे. क्षारसागरांत जर चौदा रत्नें निघून त्यांपैकीं एक रसश्रेष्ठ अमृत निघतें तर कालांतरानें पुराणें ज्या विवक्षित कार्यासाठीं जन्मास आलीं तीं विवक्षित कार्यें त्यांच्याकडून करून घेणारीं असंख्य विद्वद्रत्नें आर्यावर्तावर कां निर्माण होणार नाहींत व पुराणावरील हा अविश्वसनीयतेचा कलंक कां धुवून काढणार नाहींत. ज्यांचें मूल वेदांत आहे, तीं पुराणें मला तर सत्य वाटतात. कारण भगवान् व्यास वाल्मिक मार्कंडेय जर खरोखर परमात्माचे अवतार व त्यांची योग्यताहीं जर अनुपमेय तर त्यांनीं लिहिलेले इतिहास कां खोटे? आधुनिक शास्त्रांच्या साहाय्यानें विमानाची कल्पना पूर्णावस्थेस येईपर्यंत पुराणांतील श्रीरामचंद्राचें पुष्पक विमान कोण खरें मानीत होता? पण आतां त्यावेळीं विमानें असलीं पाहिजेत व श्रीरामचंद्रही लंकेहून अयोध्येस पुष्पक विमानांत बसून गेले ही गोष्ट सत्य असली पाहिजे असें अलीकडील विद्वान् शास्त्रज्ञ म्हणूं लागले आहेत. असो मी ही जी बरीच विस्तृत पुराणाबद्दल प्रस्तावना लिहिली याचें कारण गोदावरीचें ऐश्वर्य तिचें महत्त्व तिचें श्रेष्ठत्व व तिचा मर्त्य लोकावर अवतार घेण्याचा काल या गोष्टी वेद व पुराणें यांच्याच आधारानें सिद्ध करावयाच्या आहेत.

गोदावरी महात्म्य व सिंहस्थ महात्म्य यांत अशी कथा दिली आहे कीं शंकर पार्वतीचा विवाह चालू असतां ब्रह्मदेवाची नजर पार्वतीच्या रम्य व कोमल अंगुष्ठाकडे गेली. व पार्वतीबद्दल पापबुद्धि उत्पन्न होऊन, त्या लग्न समारंभांत जागच्या जागींच ब्रह्मदेवाचें रेतस्खलन झालें. त्यानें तें आपल्या पायाखालीं घालून तुडविलें. त्यापासून वालखिल्य ऋषी उत्पन्न झाले. समारंभांत सर्वांदेखत ब्रह्मदेवाची फजीती झाली. ब्रह्मदेव लज्जित झाले व आपल्या आसनावरून उठून पळूं लागले. ही गोष्ट शंकरांनीं पाहिली. त्यांनीं नंदीकडून त्यांस बोलावून आणिलें. व भगवंतांनीं त्रैलोक्यांतील सर्व प्राण्यांचें सार व

शक्ती काढून घेऊन तें पाणी ज्या कमंडलूत ठेविलें होतें तो कमंडलू शंकरांनी ब्रह्मदेवास दिला व त्यांतील पाणी पी म्हणजे तूं या पातकापासून मुक्त होशील असें त्यांस सांगितलें. ब्रह्मदेवांनी त्याप्रमाणें केलें व पातकापासून मुक्त झाले.

नंतर कांहीं काल गेल्यावर दानवेंद्र जो बलीराजा त्याच्या औदार्याची व राज्यशासन कुशल पद्धतीची फार ख्याती झाली. बलीची ही दिगंतर कीर्ती देवांस सहन होईना. सर्व देवांनीं ही गोष्ट श्री विष्णूस सांगितली. देवांचें म्हणणें त्यांस पटलें. व युक्तीनें औदार्यांत बलीचा पराभव करतों असें देवांना आश्वासन दिलें. त्याप्रमाणें वामनावतार धारण करून भिक्षुक बटूचें सोंग घेऊन बली जवळ त्रिपाद धरणी दान मागूं लागले. बलीनें तें देण्याचें उदक त्यांचे हातावर घातलें. तें उदक हातावर पडतांच भगवंतांनीं आपलें विराट स्वरूप प्रगट करून एक पद बळीचे मस्तकावर ठेविलें. व दुसरें कोठें ठेवूं म्हणून विचारिलें असतां, धीर व सत्व न सोडतां व वचन भंग न करतां दुसरें पद माझे पाठीवर ठेवा म्हणून परमात्म्यास सांगितलें हें बलीचें अद्वितीय औदार्य पाहून श्री महा विष्णू प्रसन्न झाले व पाताळ लोकाचें राज्य त्यास निरंतर देऊन टाकिलें. एक पद बलीचे मस्तकावर व दुसरें त्याचे पाठीवर ठेविलें तरी तिसरें पद कोठें ठेवावें ही विवंचना शिल्लक राहिलीच. परमात्म्यांनें तें पद मग ब्रह्मदेवाकडे पाठविलें. त्यांसही हें पद कोठें ठेवावें म्हणून काळजी पडली; परंतु श्री शंकरांनीं आपल्यास दिलेल्या दिव्य पाण्यानें भरलेल्या कमंडलूची आठवण झाल्याबरोबर त्यांस परमानंद झाला व त्यांनीं त्या पदाची उत्तम प्रकारें व भक्तियुक्त अंतःकरणानें जा करून त्या पदास त्या कमंडलूंत ठेविलें. कमंडलूंत ठेवता क्षणींच कमंडलुस्थित जल वर उसळलें व तें मेरूपर्वतावर पडलें व तेथून जमीनीवर चार दिशेस वाहूं लागलें. त्यापैकीं पूर्व दिशेचें जल ऋषी पितर व लोकपाल यांनीं घेतलें. पश्चिम दिशेचें पुन्हा कमंडलूंतच परत गेलें. उत्तर दिशेचें विष्णुपदावर स्थिर झालें. व दक्षिण दिशेचें शंकरांनीं आपल्या जटेंत ठेविलें. शंकर जटेंतील सर्व जल "आपोदेव्यः" आप देवता झालें. ज्या वेळीं शंक-

राचें लग्न पार्वतीशीं लागलें त्याच वेळीं ही जटेंतील आपदेवता ही शंकराची पार्वती माईपेक्षां अधिक लाडकी जलरूपा अर्धांगी बनून पार्वती मातेस हिणाऊं लागली. पार्वती मातेस हा सवती मत्सर असह्य होऊन तिनें आपले प्राणपती शंकर यांस आपल्या शीर्षस्थित सवतीचा त्याग करण्यास सांगितलें. शंकर तिचा त्याग करीनात. तेव्हां पार्वती माईनें ही फिर्याद इतर देवांकडे नेली. इतर देवही तिची दाद घेईनात. तेव्हां तिनें आपली फिर्याद आपले दोन चिरंजीव गजानन व षडाननन यांजकडे नेली. शिरस्थित आपोदेवता आमच्या वडिलांची भार्या असतांना ते तिचा त्याग कसा करतील असें ते पार्वती मातेस सांगूं लागले. परंतु त्यांनीं आपल्या पित्याचा अवमान न होतां व त्यांस क्रोधही न येतां, लाडुकपणानें शेफारलेल्या ह्या शीर्षस्थित आपोदेवतेची परभारें उचलबांगडी करून आपल्या प्रियमातेच्या सवतीमत्सररूपी हृदयस्थ शल्याचा कायमचाच नायनाट करावा व आपल्या वडिलांचा आपल्या मातेवर असलेल्या एकसंधी प्रेमांतील हा कांटा कायमचा काढून टाकून आपल्या मातेस सुखी करावें, अशी एक युक्ती काढली. मृत्युलोकावर २४ वर्षांचें अवर्षण पाडलें. त्यामुळें भूतलावरील सर्व स्थावरजंगमादि पदार्थांचा नाश झाला. गजानन, षडानन व इतर देव ही सर्व मंडळी जयेस घेऊन मृत्युलोकावर आली व तेथून महातपस्वी, शांत, विरक्त, क्षमाशील, पापभीरू, वचन पाळणारा अशा गौतम ऋषीच्या आश्रमांत आली. व गाईचें रूप धारण करून गौतमाचे शेत खा म्हणून त्यांनीं जयेस सांगितलें. ऋष्याश्रमांत आल्यावर गौतमानीं सर्वांची उत्तम शुश्रूषा करून त्यांस राहून घेतलें. पुढें एके दिवशीं जयेनें गाईचें रूप धारण करून गौतमाचें शेत खाल्लें. ज्ञान व शांत मूर्ती असूनही गौतमास थोडा राग आला व त्यानीं तृणाच्याच काडीनें त्या गाईस मारिलें. त्याबरोबर ती गाय मृतवत् जमिनीवर पडली. जिकडे तिकडे हाहा कार झाला. गजानन आदिकरून देव गौतमांनीं गाय मारल्यामुळें त्यांची फार निंदा करूं लागले. गौतमास फार वाईट वाटलें व ज्या कमंडलुस्थित जलप्राशनाच्या योगानें ब्रह्मदेव भयंकर पातकापासून मुक्त झाले तेंच जळ आपल्यास शंकराच्या जटेंतून मिळाल्यास आपणही या गो-

हत्येच्या पातकापासून मुक्त होऊं असें त्यास वाटल्यावरून त्यांनी श्री शंकराची आराधना करून शंकरास प्रसन्न करून घेतलें व आपल्या जटेंत असलेल्या आपोदेवता मला द्याव्या म्हणून वर मागितला. याच वेळीं भगीरथानेंही आपले पितर मुक्त व्हावे म्हणून शंकराची आराधना करून त्यांस प्रसन्न करून घेऊन तोच वर मागितला. शंकरांनीं दोघांसही जटेंतील जल घेऊन जाण्यास सांगितलें. त्यामुळें जटेंतील आपोदेवतेचे दोन निरनिराळे भाग होऊन त्यापैकीं एक भाग गौतमानी व दुसरा भाग भगीरथानी मर्त्य लोकांवर आणिला. तेव्हां पासून "एवं द्वैरूप्यमभवद्गंगा या गांगता यतः" ती आपोदेवता पृथ्वीवर गेली ( गां=पृथ्वी, गता=गेली ) म्हणून तिला "गंगा" हें नांव प्राप्त झालें. व गौतमानें आणली म्हणून तिला "गौतमी" व भगीरथानें आणिली म्हणून तिला भागीरथी. वामनरूप वटूचें तिसरें पद ब्रह्मदेवानें कमंडलूंत ठेविल्यामुळें कमंडलुस्थजल वर आलें व चार दिशेस वाहूं लागलें असें वर सांगितलें आहे. त्यापैकीं उत्तर दिशेचें जल पुन्हां विष्णुपदावर परत आलें म्हणून त्या जलौघास "वैष्णवी व पश्चिमेस वाहत गेलेलें पुन्हां कमंडलूंत ब्रह्मदेवाकडे आलें म्हणून त्यास "ब्राम्ही" नंदा सुनंदा वगैरे, अशीं नांवें प्राप्त झालीं. व महर्षि गौतम यांनीं जो जलभाग आणिला तो त्यांनीं त्र्यंबकेश्वर पर्वतावर ठेविला. गौतमास पावन केल्यावर तुझें काय झालें मी आतां पुन्हा स्वर्गांत किंवा कमंडलूंत जातें असें श्री गौतमी म्हणाली. हे माते तूं जशी पावन करण्यास मर्त्य लोकावर आलीस तशीच त्रैलोक्यावर उपकार करण्यास पण आली आहेस म्हणून तुला आतां येथून परत जातां येणार नाहीं. असें गौतम म्हणाले. गौतम म्हणतात ही गोष्ट सत्य आहे असें गंगेस वाटून तिनें आपल्या शरीराचें १५ विभाग करून घेऊन त्यापैकीं चार स्वर्गांत पाठविलें, ४ पातकांत पाठविलें व ७ मृत्युलोकावर ठेविले. विंध्याचलाचे दक्षिणेस जे सहा मोठमोठे सरित्प्रवाह आहेत ते याच सप्तविभागापैकीं आहेत. ते प्रवाह म्हणजे, गोदावरी, भीमरथी, तुंगभद्रा वेणिका ( वेण्या )

तापी व पयोष्णी, हे होत. भगीरथानें शंकर जटेंतील जलाचा जो भाग त्याच वेळीं आणिला तो त्यानें उत्तरेस हिमाचलावर ठेविला. त्याचे ही असेच मोठ-मोठाले सहा सरित्प्रवाह झाले. ते प्रवाह म्हणजे, भागीरथी यमुना, सरस्वती, नर्मदा, विशोका व वितस्ता हे होत.

या गंगेची स्तुती वेदांतही इतर नद्यांबरोबर केलेली आहे.

"इमं मे गंगे यमुने सरस्वति
शतुद्रिस्तोमं सचता परुष्ण्या ।
अशिक्न्या मरुद्वृधे वितस्तया
र्जी किये क्षुणु ह्या सुषोमया ॥

ऋ–वेद अ. ८ अध्याय ३ वर्ग ६ ऋचा ५.

त्याच प्रमाणें गंगा यमुना सरस्वती यांच्या संगमानें झालेलें अप्रतिम व निरुपमेय प्रयाग त्याचेंही वर्णन व त्याची फलश्रुती वेदांत वर्णिलेली आहे

सिताऽसिते सरिते यत्र संगथे
तत्राप्लुता सो दिव मुत्पतन्ति ।
ये वै तन्वंऽविसृजन्ति धीरा
ते जना सो अमृतत्वं भजन्ते ।

वेद परिशिष्ट.

अर्थः—हे गंगे, यमुने, सरस्वति, शुतुद्रि, तापरुष्णि, अशिक्वि, मरुद्वृधे वितस्तये, आर्जीकिये सुषोमये वगैरे सरितांनो ही तुमची मी करीत असलेली स्तुति ऐका. ( इमं मे गंगे याचा अर्थ )

अर्थः—ज्या ठिकाणीं गंगा व यमुना ह्या दोन महानद्या. महानदी सरस्वतीस ( प्रयागांत ) मिळतात त्या संगमावर जे कोणी स्नान करतील ते स्वर्गाप्रत जातील. व जे ज्ञानी आपलें शरीर ह्या संगमावर विसर्जन करतील (मरतील ) ते मोक्षाप्रत जातील. ('सिताऽसिते सरिते, याचा अर्थ ).

या वरून गंगा नदी ही अतुल ऐश्वर्यवान्, पुण्यवान् व पाप ताप हरण करणारी अशी महानदी आहे. कोणत्याही नाटकांतील अथवा पुराण कथेंतील प्रमुख पात्राची महती कवि अथवा पुराणिक यथेच्छ गातात. व व त्याची अनुपमेय स्तुती करतात. त्यापैकींच सिंहस्थ महात्म्यांत व गोदावरी महात्म्यांत वर्णिलेली ही गोदावरीची महती नव्हे. तिच्या महतीस. वेदांत आधार आहे.

आतां या गंगेस गोदावरी हें नांव कसें व केव्हां प्राप्त झालें,व तिच्या नांवाची गंगा, गौतमी, भागीरथी या नांवाप्रमाणें व्युत्पत्ती कशी आहे याबद्दल दोन शब्द लिहितों.

कृतयुगाचीं दोन लक्ष वर्षें गेल्यावर चक्रवर्ती मांधाता याचा शक चालू असतां प्रथमच सिंहराशीवर गुरु (ग्रह) आरूढ झाले. व त्याच सुप्रसंगीं गौतमऋषींनीं व भगीरथांनीं शंकराच्या जटेंतील पुण्यजलौघ पृथ्वीवर आणिलें असें सिंहस्थ महात्म्यांत सांगितलें आहे. त्याच सिंहस्थ महात्म्यांत पुढें असें वर्णिलें आहे कीं अवनीतलावरील सर्व तीर्थांनीं परमात्मा शंकर यांचेकडे तक्रार केली कीं आजपर्यंत सर्व जगताचीं पातकें क्षालन करण्याचें काम आम्ही केलें व त्यामुळें आमचे ठिकाणीं पापसमुच्चय झाला. त्याचें क्षालन कोण करणार ? शंकर म्हणाले, सिंहराशीवर गुरूचें आरोहण होत असतां गंगेचें आगमन मर्त्यलोकावर घडणें हा अभूतपूर्व पुण्ययोग आहे. या योगाचा पुण्यकाल जावत्कालपर्यंत गुरु त्या राशीवर आहे (एक वर्ष) तावत्काल पर्यंत आहे. आम्ही सर्व स्वर्गस्थ देव व ऋषीही वर्षभर याच नदीच्या तीरावर वास्तव्य करणार. व तुम्हीही तसेंच करा म्हणजे तुम्ही पापापासून मुक्त होऊन मोक्षाप्रत जाल.

यावरून या गंगेस त्याचवेळीं म्हणजे मांधात्याचे शकांत ज्यावेळीं गौतमानीं व भगीरथानीं अपूर्व सिंहस्थ योगावर तिला भूतलावर आणिली त्याचवेळीं तिच्या स्वर्ग व मोक्षज्ञानदान क्षमतेवरून " गोदावरी " हें धन्य नामाभिधान

तिला प्राप्त झालें असावें असें दिसतें. गोदावरी व सिंहस्थ महात्म्यांत जशी "गंगा," "गौतमी" "भागीरथी" या नांवांची व्युत्पत्ती सांपडते, तशी "गोदावरी" या नांवाची व्युत्पत्ती आढळत नाहीं. तथापि अन्यत्र गोदावरी या नांवाची व्युत्पत्ती खालीं लिहिल्याप्रमाणें आढळून येते.

गोदावरीः—गो=स्वर्ग, किंवा उपनिषदांतील मोक्षज्ञान

दा=देते.

गां ददाति तच्छीला गोदावरी.

**दा धातो वनिप्, वनोरच इति ङीप् रे फौ ।**

**यथा विभावरी. आतो ध्यातो मनिन् क्वनिप्वनिपश्च ।**

**आदन्ता द्धातो एते प्रत्यया भवन्ति ।**

गो+दा=गोदा+वन्=गोदावन्

गोदावन्+र्=गोदावर्+ङीप्=गोदावरी.

म्हणजे स्वर्ग किंवा मोक्षज्ञान देण्याचा स्वभावच जिचा ती गोदावरी. सर्व देव व सर्व तीर्थें सर्व ऋषी गोदावरीकडे आल्यानंतर स्वर्ग व मोक्षज्ञान देण्यास भूतलावर व स्वर्गावर शिल्लकच कोण राहिले कोणी राहिलें नाहीं. अतएव तो सर्व अधिकार त्या मूळच्याच पुण्यप्रतापी गंगेसच प्राप्त झाला. व तोच अधिकार चालविण्याकरितांच जी महीतलावर अवतीर्ण झाली व स्वर्ग व मोक्षज्ञान देणें हा जिचा स्वभावच बनून राहिला तिला त्याच शुभ मुहूर्तावर "गोदावरी" हें अन्वर्थक नाम प्राप्त झालें.

जनस्थान ( नाशिक ) वासी वे. शा. सं. रा. रा. आण्णा शास्त्री वारे यांनीं कृपा करून "गोदावरी" या नांवाची व्युत्पत्ती वर प्रमाणेंच देऊन शिवाय कवि अच्युतरायकृत गोदालहरी श्लोक २० व कवि अच्युतरायकृत गोदाष्टक श्लोक ६ यांत वर्णिल्याप्रमाणें ही दिली आहे.

शिखरिणीवृत्तम्.

अनेक ब्रह्मांडेष्वपि कति नवा संति सरितः ।
परंतु त्वत्तुल्या, जननि, मम नैकाप्यभिमता ।
प्रदातुं गां वाणी मुपनिषद मेवार्थ वपुषा ऽ ।
खिले भ्यस्तात्तोन्या भवति निपुणा कात्र जगति ।।

अच्युतरायकृत गोदालहरी श्लो. २०

स्रग्धरावृत्तम्

गोदेऽन्वर्थैकनाम्नि त्वमसि यदनिशं गां दिवं संददासि ।
स्नानाद्रेव साक्षाद तुल करुणया जीव संघेभ्य आरात् ।
वेदांतैकामृताब्धेरपि जनित वर ब्रह्मविद्याख्यलक्ष्मीम् ।
कस्मैचिज्जीव मुख्याभिध कमलदृशः किं ब्रुवे वैभवं ते ।।

अच्युतरायकृत गोदाष्टक श्लोक ६

वरील श्लोकद्वयांतही हे गोदावरी तूं स्वर्ग व मोक्ष सुख देणारी आहेस. तुझें वैभव मी काय वर्णन करूं असेंच वर्णन आहे.

गोदावरीस वृद्ध गंगा असेंही एक नांव आहे. काशी यात्रेहून जाऊन आलेल्या प्रत्येक स्त्री पुरुषास हें विदितच आहे कीं प्रयाग येथें दशाश्वमेधावर भरलेल्या अथवा हरिद्वार येथें भरलेल्या अथवा कानपूर किंवा ब्रह्मावर्त येथें भरलेल्या गंगेची, गोदावरी ही तिची वडील बहीण म्हणून तिची व गोदावरीची नाशकास अथवा अन्यत्र भेट करावी लागते. यांतील तरी इंगित हेंच आहे कीं गोदावरी ही हरिद्वार, वाराणशी, प्रयाग येथील गंगेपेक्षांही श्रेष्ठ आहे.

शिरडी हें गांव गोदावरीपासून ८ मैलांवर आहे तरी तें गोदातटावरील गांवांतच मोडतें. शिरडीच्या कांहीं विहिरींत पाण्याचें दुर्भिक्षच असे.

व याबद्दलची तक्रार बाबांचे कानीं गेली होती. व तेव्हांच बाबांनी सांगितलें होतें की लवकरच आपले गांवीं गोदावरी येईल व सर्व विहिरींत मुबलक पाणी होईल. व लवकरच गोदावरीचे शेकडो पाट शिरडी गांवांत व शिरडी गांवचे आजूबाजूस आले. व आतां शिरडी गांवांत गोदाजलाची जिकडे तिकडे रेलचेल झाली आहे. असो. अशा धन्य पुण्य दिव्य पवित्र गोदातटीं बाबांनी वास्तव्य केलें हें ठीक झालें. तें कां केलें याचें कारण केवळ तिचें श्रेष्ठत्व. याच सरितेच्या तीरावर असंख्य तीर्थें व क्षेत्रें वसलीं आहेत. व तिच्याच तीरावर असंख्य साधुसंतांनीं निवास केला आहे.

हीच गोदावरी जेव्हां पूर्वसमुद्रास मिळावयास गेली तेव्हां सरित्पतिराजानें तिच्या प्रबळ ओघामुळें तिचा स्वीकार करण्याचें नाकारलें. व तूं लघुरूप धारण करून आलीस तर मी तुझा स्वीकार करीन असें सांगितलें. माझ्या मुखाच्या ठिकाणीं वसिष्ठादि सप्त ऋषींची वसती करण्यास तूं घेऊन येशील तर मी लहान स्वरूप धारण करून सप्तमुखानें येऊन तुला मिळेन अशी गोदावरीनें पतीराजास अट घातली. ती त्यानें कबूल केली. त्याप्रमाणें गोदावरी ही पूर्वसमुद्रास सप्तमुखांनीं दक्षिणतेलगणांत जंबू द्वीपांत राजमहेंद्री नगराजवळ भिन्न होऊन नंतर पूर्व समुद्राला मिळाली ( पहादास गणूकृत संतलीला मृत अ० २१ ओव्या २६, २७, २८ ) त्यासच हल्लीं सप्तगोदातीर असें म्हणतात व त्या प्रत्येक मुखावर वसिष्ठ आदीकरून एकेक याप्रमाणें सप्तऋषींची स्थापना सात मुखावर होऊन तीं सप्तमुखें वसिष्ठादि सप्ततीर्थें म्हणून प्रसिद्ध आहेत. ही हकीकत गोदावरी महात्म्यांतच आहे.

वरील एकंदर विवेचनावरून प्रिय वाचकांचे लक्षांत येईल की गोदावरी ही मूळचीच धन्य. त्रैलोक्याचें पातक मिळून तें नाहीसें करण्याकरितां ती बाबांचे जवळ आली म्हणून ती त्याहीपेक्षां धन्य. तिच्या तीरावर वसल्यामुळें तें शिरडी ग्रामही धन्य. व सरित्श्रेष्ठ गोदावरीसही पावन करण्याचा अधिकार ज्या बाबांचा ते परब्रह्म बाबा सर्वांत धन्य.

बाबांनीं गोदावरी तीरावर कां निवास केला याबदलचें विवेचन यथामति केलें. यापेक्षां जास्त माहिती कोणाही साईभक्तांस मिळाली असल्यास त्यांनीं ती कृपा करून श्री साईलीलेच्या एखादे अंकांत प्रसिद्ध करावी. एवढी माझी त्यांस नम्र विनंती आहे.

स्रग्धरावृत्तम्.

शुभ्रांगे, शोभनांगे, सुरवृहदपगे, शीतलांगे सुधांगे।
श्रीकंठस्यांतरंगे, त्रिभुवनपथगे, संसृतेःसंगभंगे।
सांबस्योच्चांगशृंगे, विलससि सुभगे, प्रोज्झितोत्संगसंगे।
हे गंगे, बालभृंगश्चिरमभिरमतां त्वपदांभोजतुंगे ॥

अर्थः—हे गंगे गोदावरी, तुझी तनु स्वच्छ सुंदर आहे. हे देवांचे महासरिते, तुझें शरीर थंड व अमृतमय आहे. हे त्रिभुवनांतून गमन करणारे, तूं शंकराच्या अंतःकरणास रमविणारी अशी असून प्रपंच्यावरील प्रेमाचा भंग करणारी आहेस. हे परमभाग्यशीले शंकराच्या अंकासनाचा त्याग करून त्याच्या मस्तकावरील जटेंत शोभणारी अशी आहेस. त्या तुझ्या पदकमल केंसरांच्या उच्चभागीं ह्या बालषट्पदाला ( भृंग्याला ) निरंतर रममाण होऊं दे.

ज्यांच्या पुण्य प्रेरणेनें वरील गोदावरी वैभवाचें विवेचन केलें त्यांच्याच श्री साईनीलकंठाच्या पुण्यपदावर हें विवेचन रूपीं वाग्गुलाब पुष्प व संस्कृत व मराठी मिळून केलेल्या ६ कवितारूपीं षड्दल वाक्कमल नम्रपणें अर्पण करून हा बराच लांबलेला लेख संपवून आपली रजा घेतों.

बाबांचें बाळ.

## श्रीसद्गुरु साईराजायनमः

### पुण्यतिथीकरितां केलेलें अष्टक

रा. रा. श्री साईलीला कर्ते यांस—सा. न. वि. वि. आपल्या विबुधमान्य श्रीसाइलीलेच्या एखादे मनोहर अंकीं श्रीसद्गुरु साइमहाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्याच स्फूर्तीनें सुचलेल्या, व त्याच साइपदांबुजाच्या ठिकाणीं अर्पण केलेल्या संस्कृताष्टदलकमलास कृपेनें स्थान मिळेल अशी आशा आहे.

शिखरिणी.

अयं साई स्थाणुः किमुत गजतुंडः शिवसुतः
रमाया आहोस्विद्रमण इति विष्णुः किमपरः ।
पुनर्गीतां ख्यातुं विजयगुरुकृष्णः किमथवा ।
अयं साई ब्रह्मा, भवतु किमु तस्मै मम नमः ॥ १ ॥

अर्थः—हा साई शंकर आहे ! किंवा शंकरात्मज गजानन आहे ! किंवा लक्ष्मीपती दुसरा विष्णूच आहे ! किंवा भगवद्गीता सांगणारा अर्जुनगुरुकृष्ण परमात्मा आहे ! किंवा ( ब्रम्हांड निर्माण करणारा ) हा साई चतुरानन ब्रह्मदेव आहे ! ( असा जो कोणी असणारा ) त्यांस माझा नमस्कार असो.

शार्दूलविक्रीडीतम्

त्यक्त्वा हि स्वपुरीमिमां च धरणीमिंद्रः किमत्रागतो ।
श्रीदत्तः पुनरागतोऽवनितलं किं साधुभक्तेच्छया ॥

रामो मानवरंजनाय किमयं सीतापतिर्वैभवेत् ।
स्यात्साइप्रभुरुत्तमश्च सविता कस्मैचिदस्मै नमः ॥ २ ॥

**अर्थः**—आपल्या ( अमरावती ) नगरीचा त्याग करून ह्या मेदिनी तळावर हा अमरनाथ इंद्रच आला कीं काय ! किंवा सद्भक्तांच्या इच्छेनुरूप ह्या जगतितलावर हा पुन्हा श्री दत्तावतारच झाला कीं काय ! किंवा ( भक्तरूपी ) प्रजाजनार्थ हा जानकीवल्लभ रामचंद्र पुनरपि अवतरला कीं काय ! किंवा सर्वश्रेष्ठांत श्रेष्ठ असा हा साई प्रत्यक्ष :सूर्यनारायणच आहे कीं काय ! ( वरील पैकीं ) तो जो कोणी असेल त्यास माझा नमस्कार असो ).

आर्यावृत्तम्

सरसि यथा सरसीजं, शिखिनो, मेघस्य दर्शनं काले ।
हृदयं सुखयसि, वदनं तव, शरदिंदुर्यथा साइ ॥ ३ ॥

**अर्थः**— कमल ज्याप्रमाणें सरोवरास किंवा वर्षाकाळचे मेघ जसे मोराच्या अंतःकरणास आनंद देतात, त्याप्रमाणें हे साई तुझें मुख शरदृतूंतील चंद्राप्रमाणें मला आनंद देतें.

मंदाक्रांता.

सत्येवास्मिञ्जगति बहवः साधुसिंहाश्च रम्याः ।
तेषां मध्ये मम तु महती वासना साइ राजे ।
येनाद्यापि स्मरणममरं ते कृतं मानसे मे ।
तस्मै साक्षात्परम गुरवे सन्त्वनन्तप्रणामाः ॥ ४ ॥

**अर्थः**—ह्या भूतलावर रमणीय असे विपुल साधुश्रेष्ठ आहेत. परंतु त्या सर्वांत माझी बलवत्तर आवडच साइराजाच्या ठिकाणीं आहे. अद्याप

पावेतों ज्यानें ( साइराजानें ) माझ्या अंतःकरणांत आपल्या बद्दलची अखंड स्मृति जागृत ठेविली आहे त्या साक्षात् परमश्रेष्ठ गुरूला माझे अनंत नमस्कार असोत.

मंदाक्रांता.

साक्षान्मूर्तिस्त्वमसि परमा, साइ विश्वेश्वरस्य ।
ईशः कोऽपि त्रिभुवनपतिः संशयो नास्ति तत्र ।
बालस्य त्वं परगुरुयमोनाचिकेतस्य चासि ।
बालायास्मै तव चिरपदे देहि स्थानैक भागम् ॥ ५ ॥

अर्थः—हे साई तूं प्रत्यक्ष विश्वेश्वराची श्रेष्ठ मूर्ति आहेस. तूं कोणीतरी ब्रह्मांडाचा मालक व स्वामी आहेस. तूं नाचिकेत बालाचा परम गुरु यमधर्मराज आहेस. ( कठोपनिषदांतील दृष्टांत आहे ) असा जो तो तूं ह्या बाळाला ( मला ) तुझ्या अविनाशि पदाच्या ठिकाणीं उत्तम जागा दे.

उपजातिवृत्तम्.

देवायते सत्वगुणेन साधुः । सदायते स्वप्रभया नरोऽपि ।
आसीत्ततः साइसुरस्य भिन्ना । कथा नमोमे शतधास्तु तस्मै ॥६॥

अर्थः—सत्वगुणाच्या उत्कर्षानें साधु लोक देवकोटी प्रत जाऊन पोंचतात. त्याचप्रमाणें मनुष्यही स्वतःच्या तेजानें साधुत्वाला जाऊन पोंचतो. परंतु ( ह्या ) साई देवाची त्यांच्यापेक्षां गोष्टच न्यारी आहे. अशा त्या साईराजाला माझा शेंकडों प्रकारानें प्रणाम असो.

अनुष्टुपवृत्तम्.

चित्रकं तव संवीक्ष्य मशीदस्थं मनोहरम् ।
स्मरामि पुण्यघस्रांस्तान् हे साई सुरपुंगव ॥ ७ ॥

अर्थः—हे सुरश्रेष्ठ साईदेवा, मशीदींत ठेविलेली आपली मनोवेधक-छबी पाहून ( डोळ्यांपुढें आली म्हणजे ) मला ( शिरडीस आपल्या पायाजवळ घालविलेल्या ) त्या पुण्य दिवसांची आठवण होते.

अनुष्टुप्वृत्तम्

सद्भक्तेन यथा साई । साइनैव तथाव्रती ।
न कांचिदुपमां दातुं । समर्थोऽस्मि दयानिधे ॥ ८ ॥

अर्थः—हे करुण सागरा, सद्भक्ताच्या योगानें जसे आपण साइदेव ( शोभतां ) त्याचप्रमाणें आपल्यामुळें ( साइदेवामुळें ) सद्भक्त शोभतात. परंतु आपल्या या उभयसंयोगास ( अद्वितीय संयोगास ) कोणत्याच प्रकारची उपमा देण्यास मी समर्थ नाहीं. ( आपली जोडी निरुपमेय आहे ).

आपला नम्र सेवक

**श्रीपाद बालकृष्ण देव**

विद्यार्थी, सीनियर बी. ए. क्लास एल्फिन्स्टन कॉलेज मुंबई.

## श्री साइदत्तगुरुवेनमः

सां. न. वि. वि. मागील आपल्या श्री साइलीलेच्या अंकांत कायम द्रव्यनिधिसमुच्चया संबंधानें कांहीं योजना सुचविल्या आहेत. आज एक दोन सुचल्या आहेत त्यांसही श्री साइलीलेच्या एखादे अंकीं स्थान मिळावें अशी प्रार्थना आहे.

१. गोरक्षण कार्यासाठीं किंवा श्री सद्गुरुसमर्थ रामदास स्वामी यांच्या गडावरील उत्सवकार्यासाठीं अगर इमारतीसाठीं अथवा खेड येथील श्रीसमर्थ चंडीराम महाराज किंवा कवाड येथील श्रीसमर्थ सखाराम महाराज यांच्या पुण्यतिथींच्या उत्सवार्थ द्रव्यनिधि गोळा करण्यासाठीं जसे स्वयंसेवक

अथवा पगारी अथवा कमिशन घेऊन काम करणारे प्रचारक असतात तसे बाबांचा कायमनिधि जमविण्याकरितांही नेमावेत. व त्यांनीं गांवोगांव हिंडून शिरडी संस्थानची व बाबांची सर्वांस माहिती करून देऊन द्रव्यनिधि जमा करावा व त्याचा हिशोब व भरणा विवक्षित वेळीं खजिनदार यांजकडे करावा. प्रचारक, बाबांचे भक्त, विश्वासू, स्वयंस्फूर्तीनें, निरपेक्ष बुद्धीनें व निरलसपणानें कर्तव्य समजून काम करणारे असावे. उदाहरणार्थ पैसाफंड. पैसा फंडाची कल्पना निघून त्यास निरपेक्षबुद्धीनें काम करणारे प्रचारक मिळाल्यामुळें आज पर्यंत किती तरी द्रव्यसमुच्चय झाला आहे.

२ प्रत्येक साइभक्तानें आपले घरीं एक पेटी करावी. तिला वरून एक लहानसें छिद्र ठेवावें व तिला कुलुप लावून ती बंद करून घरांत एखादे खांबास लावून ठेवावी. व तींत रोज बायका मुलांनीं हव्य कव्य, तीथवार पर्वणी निमित्त बाबांच्या नांवांनें कांहीं तरी टाकीत असावें. व महिना खलास झाला की ती पेटी उघडून तींत जें काय जमलें असेल तें खजिनदारांकडे पाठवून द्यावें. हें असें करण्याचें कारण पुष्कळ वेळां इच्छा असली तरी आपण बाबांच्या नांवानें पैसा निराळा काढून ठेवण्यास विसरतों. किंवा निराळा काढून ठेविला तरी तो आपल्या दिनचर्येच्या पैशाच्या पेटींत अगर पिशवींत अगर डब्यांत अगर फडताळांत ठेवीत असल्याकारणानें त्याची विस्मृती होऊन तो पुन्हा संसारकार्याकडेच खर्च होतो. दर रुपयास एक पै किंवा दोन पै प्रमाणें धर्मादायाकरतां व्यापाऱ्यांनीं काढून ठेविलेल्या हजारों-लाखों रुपयांच्या रकमा जशाच्या तशाच धर्मादायाकडे न जातां संसारकार्याकडेच खर्च झाल्याचीं शेंकडों उदाहरणें आहेत. याकरतां वर सुचविलेल्या युक्तीमुळें जिकडील रक्कम तिकडेच जाण्याचा संभव फार आहे. यामुळें किरकोळ पैसा सुद्धां वेळीच पेटींत पडेल व महिना अखेर नकळत अनायासें बरीच शिल्लक पेटींत दिसेल. व त्याचा बोजा मुळींच वाटणार नाहीं.

३. या प्रमाणें व इतर प्रत्येक तऱ्हेनें होणारी पोंच प्रत्येक श्री साई-लीलेच्या अंकांत प्रसिद्ध करावी. म्हणजे "जलबिंदुनिपातेन क्रमशः पूर्यते

घटः " किंवा " थेंबे थेंबे तळें सांचे " या अत्युत्तम म्हणीची प्रतीति येऊन या योगानें प्रत्येक महिन्यास किती द्रव्यनिधि जमला हें प्रत्येकास कळेल. हल्लीं याबद्दल कोणासच कांहीं कल्पना करतां येत नाहीं.

बावांचें बाळ.

श्रीसद्गुरुसाइराजायनमः

सप्रेम साष्टांग नमस्कार वि० वि० आपल्या विबुधमान्य श्री साइ-लीलेच्या एखादे अंकीं खालील मजकुरास स्थल मिळेल अशी विनंति आहे.

## बावांचें स्मारक अथवा शिरडी कशी असावी.

शके १८४० सालीं विजयादशमीचे सुमुहूर्तावर मंगळवारीं तिसरे प्रहरीं ( ता० १५ आक्टोबर १९१८) बाबांनीं भक्तकल्याणासाठीं आपला पुण्यपवित्र व दिव्य देह ठेविल्यानंतर वेळीं पुष्कळ मंडळी भक्तवर्य शांत मूर्ति रा० रा० काकासाहेब दीक्षित यांचे पार्ले येथील बंगल्यांत जमली असतां बऱ्याच भक्तमंडळीकडून बाबांच्या स्मारकासंबंधानें निरनिराळ्या पण माझे अल्प समजुतीप्रमाणें कांहींशा एकदेशी सूचना येऊन त्याबद्दल चर्चा सुरू झाली. वास्तविक पाहतां अनंत कोटी ब्रह्मांड व्यापक सद्गुरूंचें स्मारक कोण व कसें करणार व तें सर्वांगसुंदर तरी कसें होणार ? संतांची परीक्षा करण्यास संतच व्हावें लागतें. परमात्म्याचें ऐश्वर्य, सामर्थ्य व व्याप-कता जाणण्यास परमात्माच व्हावें लागतें. "स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती " या महाराष्ट्र कविवर्य मयूरोक्तिप्रमाणें बाबांचें सर्वांगसुंदर स्मारक करण्यास त्यांच्याच सारखे अद्वितीय सत्ताधारी सत्पुरुषच निर्माण झाले पाहिजेत. तथापि बाबांचे कांहीं तरी स्मारक व्हावें अशी प्रत्येक भक्त अपेक्षा करणारच. व मानवी प्राणी त्यास जी बुद्धिमत्ता परमात्म्यानें दिली आहे, त्याप्रमाणें व त्या कार्यासाठीं द्रव्यमदत जशी मिळण्याचा संभव असेल

त्यावर नजर देऊनचं सूचना करणार. त्यामुळें भक्तवृंदांकडून त्यावेळीं झालेल्या सूचना केवळ एकदेशीच होत्या म्हणून त्यांना नांवें ठेवण्यास मी केव्हांही तयार नाहीं. व तसा माझा उद्देशही नाहीं. उलट त्या निरनिराळ्या स्वरूपाच्या सर्व सूचनांचा समावेश एकाच योजनेंत कसा होईल व माझ्या अल्प बुद्धीप्रमाणें त्या योजनेस अल्पांश प्रमाणांत तरी सर्वांगसुंदरत्व कसें प्राप्त होईल याबद्दलचे विचार तेंव्हांपासून आज कित्येक वर्षें माझे मनांत घोळत आहेत. ते मी आतां वाचकांपुढें ठेवणार आहे. 'सर्वारंभा स्तंडुलाः प्रस्थमूलाः' या न्यायानें ते विचार वाचकांस आज काल्पनीकच वाटणार. परंतु कोणतीही गोष्ट जी कालांतरानें मूर्त स्वरूपास येते तिचा उगम प्रथम कल्पनेंतच होत असतो. कल्पना विचारास पटली म्हणजे ती वाचेंत येते व नंतर वाचेंतून ती कृतींत येते. असो फार दिवस नुसतें डोक्यांत घोळत असलेले विचार मग ते काल्पनिक असोत वा व्यावहारिक असोत, एकदां सत्हृदय वाचकांपुढें ठेवावे व त्याबद्दल पुन्हा चर्चा सुरू व्हावी असें वाटल्यावरून त्यांचें आज थोडेंसें दिग्दर्शन करण्याचें योजिलें आहे.

माझे विचार पैशाच्या अभावीं काल्पनिकच ठरणार. परंतु यथास्थित द्रव्यबळ असल्यावर ते व्यावहारिकच आहेत. आतां विचार पटून त्याप्रमाणें कामास लागणारा पैसा खर्च करणारीं माणसें सांपडणें तूर्त तरी कठीण दिसतें. परंतु पौषाचे अगर वैशाखाचे महिन्यांत आकाश निरभ्र असून कडकडीत ऊन पडलें असतांही निमिषमात्रांत तेंच आकाश मेघांनीं आच्छादित होऊन पर्ज्यन्यराज गर्जनारूपीं दुदुंभी व विद्युत् लखलखाट रूपीं दिव्य मशाली व अनंत धारारूपीं अगणित सैन्य या आपल्या लवाजम्यासह अवनीतलावर अवतीर्ण होऊन जिकडे तिकडे गारीगार करून सोडल्याचीं उदाहरणें कांहीं थोडी नाहींत. सारांश परमात्म सृष्टींत अशक्य दिसणाऱ्या गोष्टी त्याच्या लीलेनें शक्य होतात. व त्याच जगदीशाच्या अतर्क्य लीलेचें आपण कौतुक करतों व धन्यवादही गातों. त्याचप्रमाणें श्री सद्गुरूरायांच्याच मनांत

आल्यावर अशीं खर्च करणारीं माणसें निघण्यास अगर आपण होऊन पुढें येण्यास उशीर कसला ? "ये नाम किंचिदिह नः प्रथयंत्यवज्ञां। जानंतु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः। उत्पत्स्यतेऽस्ति मम कोपि समान धर्मा। कालोऽत्ययं निरवधिर्विपुलाच पृथ्वी" ॥ या प्रसिद्ध कविवर्य भवभूतीच्या मालती माधव अंक १ ला श्लोक ६ वा यांत म्हटल्याप्रमाणें कालही अगणित आहे. स्थलही अमर्याद आहे, व द्रव्य खर्च करणारीं माणसेही असंख्य आहेत. करितां आतांच नसल्यास कालांतरानें अवनीतलाच्या कोठल्यातरी प्रदेशावर कोणी तरी भावनाप्रधान व संपत्तीवान माणसें निघतील व माझे विचारास मूर्तस्वरूप देतील अशी मला बळकट आशा आहे.

प्रथमतः शिरडी कशी असावी हें सांगून ती बाबांचें सर्वांग सुंदर टुमदार व नमुनेदार लहानसें शहर असावें. तें साधें असावें, त्यांत निसर्ग व कृत्रिम शोभेचें मिश्रण असावें. त्याचा परीघ ८–९ मैलांचा असून तें अष्टकोनी असावें. शहर रचना व शहर सुधारणा करणारी एक संस्था तेथें निर्माण करावी. तिनें रस्ते, हवा, पाणी, व प्रकाश यांची उत्तम व्यवस्था करावी. मुंबई इतके रुंद नाहींत पण त्या धर्तीचे मुख्य रस्ते व दोहों बाजूस ( फूटपाथस् ) पायमार्ग असावे. रस्त्याचे बाजूस सुंदर झाडें असावीं. शहरांत ठिकठिकाणीं पाणी विपुल असावें, कारंजीं असावींत. घरें साधीच असावी. पण प्रत्येक घरीं पुढें व मागें बगीचा असून मागे विहीर असावी. प्रत्येक धंदा करणाऱ्या लोकांची दुकानें अथवा पेठा निरनिराळ्या असाव्या. ठिकठिकाणीं सार्वजनिक धर्मशाळा, आरामस्थानें, उपहार गृहें, पुष्पफलउद्यानें, व्यायामशाळा, संगीतशाळा, क्रीडास्थानें, वेदशाळा, संस्कृत पाठशाळा, अजबखानें, किताबखाने, मंडया, मार्केटें असावीं. आठवडयाचे धान्याचे बाजार, गुरांचे बाजार, भाजी फळफळावळींचे बाजार भरावेत. ठिकठिकाणीं मुबलक जलविहार करण्याचे तलाव असावे. या शहरीं मराठी शाळा, उर्दू

शाळा, गुजराथी शाळा, हुन्नर शाळा, व इंग्रजी शाळा असाव्यात. हायस्कूलें (सरस्वती मंदीरें) आर्ट (कला) मेडिकल (वैद्यक) असावीं. युनिव्हर्सिटी असावी (विश्वविद्यालय) त्या युनिव्हर्सिटींत सर्वांगसुंदर शिक्षण देण्याची व्यवस्था असावी. शारीरिक मानसिक, व्यावहारिक, धार्मिक व पारमार्थिक शिक्षण देण्याची व्यवस्था असावी. प्रत्येक ठिकाणीं बाबांचे फोटो, मूर्ती अगर नांव दिसेल अशी सोय व्हावी. शहरांत ठिकठिकाणीं अन्नछत्रें असावीं. त्यांचा उपयोग बहुशः किंवा प्रायशः गरीब, निराधार विद्यार्थी, पीडीत किंवा व्यथीत सेवेकरी, विरक्त, संन्यासी, पंगू, दुर्बल बैरागी, फकीर योगी, ध्यानी, मौनी वगैरे लोकांकरतांच व्हावा. ठिकठिकाणीं पण जरा शहरा बाहेर संन्याशाकरितां व निरनिराळ्या शास्त्रांत पारंगत होऊन त्यांत कांहीं तरी जास्त शोध लावण्याकरितां उत्सुक तत्पर लायक व आजन्म विद्याव्यासंगीं व ब्रह्मचारी अशा लोकांकरितां शिवालयें व मठ बांधून ठेवावे. व त्या मठांत व शिवाल्यांत त्या त्या शास्त्राचीच रात्रंदिवस चर्चा चालावी. उत्कृष्ट संन्यासी, उत्कृष्ट योगी, उत्कृष्ट विरागी पुरुष असतील तर यांची जेवणा खाणाची सोय मठांत किंवा शिवाल्याजवळच करावी. संन्याशांनीं गीता, पंचदशी, शारीरभाष्य व उपनिषदें यांचीच चर्चा करीत रहावें, हे सर्व मठ व हीं शिवाल्यें ब्रह्मविद्या, योग व विरक्तिही प्रत्यक्ष कृतींत व आचरणांत आणून दाखविणाऱ्या भक्तिज्ञान वैराग्याच्या सोपान परंपराच असाव्या. या शहरीं वेद शाळाही असावी. आर्यवैद्यकाचा येथें जिर्णोद्धारच व्हावा. सारांश शिरडी शहर १४ विद्या ६४ कला यांचें माहेरघर असावें. शास्त्री, विद्वान्, पंडित, मुमुक्षु लोकांचें हें आश्रयस्थान असावें. शिरडी क्षेत्रांचें क्षेत्र व तीर्थांचें तीर्थ असावें. प्रत्येक घरीं व संस्थेंत सकाळ संध्याकाळीं तरी बाबांची पूजा अर्चा भजन नामस्मरण व वंदन मोठया आनंदानें व प्रेमानें होत असावें. प्रत्येक घरीं, व संस्थेंत प्रथमतः बाबांचे नामोच्चरण वंदन करून प्रत्येक कार्यास-दररोजच्या दिनचर्येच्या

सुद्धां सुरवात व्हावी. शिरडींतील प्रत्येक व्यवहारांत बाबांचे नांव प्रामुख्यानें ऐकूं यावें. प्रत्येक जीव बाबांच्या अत्युच्च व अत्युत्कट भावनेनें नखशिखांत भरलेला व रमलेला असावा. शिरडी हा भूलोकींचा स्वर्ग असावा. शिरडी ही भूलोकीची अमरावती असावी. शिरडी हें नंदनवन असावें. "कृष्ण कृष्ण चिमण्या शुक बोलती" या वामन पंडितांच्या गोकुळ वर्णनाप्रमाणेंच "गोकुळीच्या सुखा अंत पार नाहीं लेखा" या संतचूडामणी तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणें शिरडीच्या सुखाला अंतपार नसावा. व तेथील चिमण्या पोपट व मैना आदिकरून पक्षांनीं सुद्धां "बाबा बाबा" या नामाचा सारखा रात्रंदिवस गजर करावा. लेंडी नाल्यांत श्री गोदावरीचे पाण्याचा मोठा लोट आणून सोडावा व लेंडी नाल्याच्या उभय तीरावर सुंदर घाट बांधावे. उपरीं निर्दिष्ट शिवालयें व मठ या घाटासंनिध असल्यास उत्तमच. अथवा शिरडी शहराच्या आसपास जे गोदावरीचे कालवे गेलेले आहेत त्या नजीक असल्यास चालतील. हीं शिवालयें, व मठ सुंदर बाग-बगीच्यांनीं सुशोभित केलेलीं असावीं. तीं बहुधा निर्जन ठिकाणींच असावींत. तेथें नैसर्गिक शांतताच असावी. त्या त्या विषयांचे प्रत्यक्ष ज्ञान करून घेण्याची इच्छा करणारींच अत्यल्प संख्याक माणसें तेथें यावीं, येथें हिंस्र अथवा वन्य श्वापदांचा त्रास असूं नये. हीं ठिकाणें इतकीं रम्य असावीं की त्यांचें दर्शन होतांच शृंगारप्रिय विषयलोलुप प्राण्याससुद्धां आपण संसार-त्याग करून या ठिकाणीं योगाभ्यास करण्यास अथवा ब्रह्मज्ञान संपादण्यास यावें, अशी बलवत्तर इच्छा व्हावी. या ठिकाणीं दिवसा दोन चार हरिणें अथवा मोर आले तर चालतील. किंवा उषःकालीं कोकिलांचा मधुर स्वर ऐकावयास आल्यास चालेल. (श्री ज्ञानेश्वरी अ. ६ "शुचौ देशेंप्रतिष्ठाप्य" या श्लोकावरील ओव्या १६३ पासून १८० पर्यंत पहा) याच ठिकाणीं आसपास कोठें तरी बाबांचें एक फल पुष्पोद्यान असावें. यांतील फळें व पुष्पें दूर्वा बेल तुळसी नित्य बाबांच्या त्रिकाल पूजेच्या व नैवेद्याच्या वेळीं उपयोगांत यावीं. महाराजांच्या दररोजच्या पूजेस सुवासिक व सौगंधिक

निरनिराळ्या पुष्पांचे हार व इतर सामग्री मुबलक असावी. याच बागेंत बाबा लेंडीवर गेले म्हणजे स्वतः लेंडी नाल्याचें पाणी ज्या झाडांस घालीत असत त्याच जातीचीं पुष्कळ झाडें लावून तीं परम पवित्र मानून अत्यंत काळकळीनें त्यांची जोपासना करावी. बाबांच्या मंदिरासमोर पण त्यास जोडून मशीदमाईपर्यंत एक सुंदर व भव्य सभामंडप असावा. मंदिरामागें अथवा बाजूस एक लहानशी पुष्कर्णी असावी. त्यांत श्रीगोदावरीचें स्वच्छ जलभरपूर असावें. ती फार खोल असूं नये. तींत नानातऱ्हेचे व निरनिराळ्या रंगाचे मासे असावे. त्यांची हिंसा कोणीं करूं नये. त्यास "साई सरोवर" असें नांव द्यावें. तें दिव्य व पुण्यतीर्थ मानावें. त्यांत फक्त स्नान करावें. कपडे धुऊं नयेत. कपडे धुण्यास घाटावर जावें. या तलावाच्या भोंवती एक लहानसा मनोहर फलपुष्पांचा बगीचा असावा. मंदिराचा मुख्य भाग, साइसरोवर व सभा मंडप यांचे भोंवती बरीचशी जागा सोडून विस्तीर्ण कोट असावा. कोटास चार पांच दरवाजे असावेत. या कोटाचे आंत कोटाचे भिंतीस लागून चारी बाजूस निरनिराळीं लहान लहान मंदिरें बांधून त्यांत हिंदुस्थानांत हिमालयापासून रामेश्वरपर्यंत व द्वारकेपासून जगन्नाथापर्यंत असलेल्या सर्व मुख्य मुख्य देवांच्या मूर्ती स्थापन कराव्यात. हिमाल्यांतील हरिद्वार, व बद्रिकेद्वार, बद्रीनारायण, गंगोत्री, जम्नोत्री सरस्वती उगमस्थान, काश्मिरांतील महासरस्वती, नेपाळांतील पशुपती, बारा ठिकाणचीं बारा जोतिर्लिंगें, आठ ठिकाणचे अष्ट विनायक, अयोध्या, काशी, विश्वेवर, प्रयागराज, त्रिवेणी, गया, कलकत्याची महाकाली, जगन्नाथ अमृतसर येथील सुवर्ण मंदीर, कुरुक्षेत्र, मथुरा-वृंदावन गोकूळ, द्वारका, अबू पहाडावरील श्रीदत्त पादुका, नाशीक येथील श्रीरामचंद्रजी, पंढरपूर गांडगापूर, कोल्हापूर येथील महालक्ष्मी, वाडी, औदुंबर श्रीआळंदी, गिरी, शिवकांची, विष्णुकांची त्रीपतीरामेश्वर वगैरे मूर्ति स्थापन कराव्या. त्यांच्या पूजेची व्यवस्था विद्यार्थी लोकांकडे सोंपवून द्यावी. याच मंदिराचे आवारांत ओंवऱ्याकरून विद्यार्थ्यांची राहाण्याची सोय करावी. मंदिरा समोर एक

भव्य व उंच दीपस्तंभ असावा. कोटाचे समोरील दरवाज्यावर चौघडा व सनईची व्यवस्था असावी. मंदिराचें आंत प्रदक्षणेस सुंदर रस्ता असावा. हल्लीचे समाधीवर सुंदर संगमरवरी दगडाचे लहानसें नक्षीदार मंदिर असावें. या लहानशा मंदिरांत समाधीचे वरचे बाजूस बाबांची संगमरवरी दगडाची मूर्ती बसवावी. पंचामृत स्नानाचें व शुद्ध जलस्नानाचें पाणी जाण्याकरितां समाधीचें भोंवती चारी बाजूस समाधीस लागून सहा इंच रुंदीची व एक दीड इंच उताराची जागा असून तें सर्व पाणी जाण्याकरितां समाधीच्या ओटयाच्या एका बाजूस ओटयाच्या भितीस लागून एक संगमरवरी दगडाची लहानशी कुंडी असावी. म्हणजे तीर्थाचें पाणी पायदळीं न जातां सर्वांस मुबलकपणें घेतां येईल. समाधीपुढें पाण्याचें एक सुंदर कारंजें असावें. मंदीरावर सुंदर शिखर असावें. कै. बापूसाहेब बुटींच्या अकालीं निधनामुळें जें काम राहिलें तें आतां भक्तमंडळींनीं पुरें करावें.

बाबा हे हिंदु व मुसलमान या दोघांस सारखेच मानीत. पूजा हिंदुकडूनच करवून घेत. आरतीही हिंदूकडूनच करवून घेत. बाबांचें दरबारांत हिंदु-मुसलमानांचा दर्जा सारखाच असे. दोघेही त्यांच्या पायांस स्पर्शकरून त्यांचें वंदन करीत. ( ब्राम्हणाच्या स्त्रिया बाबांचा विटाळ मानीत नसत पण इतरांचा मानीत असत ) बाबांनीं पंचभौतिक शरीर विसर्जन केल्यावर हिंदु व मुसलमान यांच्यामध्यें त्यांच्या शवाची व्यवस्था करण्याबद्दल तंटा उपस्थित झाला. मुसलमान म्हणत कीं बाबा हे मुसलमान असल्यामुळें आम्ही त्यांचें शव दरग्यांत नेऊन त्यावर कबर बांधूं. हिंदु म्हणत कीं बाबा हे हिंदु असल्यामुळें आम्ही त्यांचें शव हल्लींचे मंदिरांत ठेवून त्यावर समाधी बांधूं. आपल्या तंटयांत महाराजांच्या शवाचे मात्र हाल होत आहेत, व ही गोष्ट उभयतांसही लांछनास्पद आहे, असें उभय जातींतील पुढारी मंडळीचे लक्ष्यांत येऊन असें ठरलें कीं जर मुसलमानांना मंदिरांत दर्शनाला जाण्याची मोकळीक असेल तर हिंदूनीं हल्लींचे मंदिरांत बाबांचें शव ठेवून त्यावर समाधी बांधावी. बाबांच्या तालमींत व कृपाछत्राखालीं वाढलेल्या हिंदु पुढारी मंडळींनी ही

गोष्ट कबूल केली. व त्याप्रमाणें हल्लीं वहिवाट सुरू आहे. यावरून घ्याव- याचें काय कीं अखिल हिंदुस्थानांत हिंदूंचे कोणत्याही देवालयांत पाहाण्यास न सांपडणारी अभेदबुद्धीची अथवा समतेची वहिवाट येथें पहावयास सांपडते.

शिरडींतील रस्ते, हौद, तोटया, तलाव, कंदील, संस्था, शाळा, ... मंदिरें, पीठें, बागबगीचे, धर्मशाळा, व इतर स्थानें म्हणजे प्रत्येक वस्तु बाबांच्या नांवानें अन्वित असावी. म्हणजे प्रत्येक वस्तंस बाबांचें ... निरनिराळें नांव ठेवावें.

बाबांचे मंदिरांत चौघडा व सनई नेमानें त्रिकाल सुंदर रीतीनें वाजली पाहिजे. हल्लीं ही वाजते परंतु ती नियमितपणें उत्कृष्ट रागरागिणींत वाजत नाहीं. समाधीस रोज त्रिकाल स्नान व एकदां अभिषेक पंचसूक्त पवमानाचा व रुद्राचा झाला पाहिजे. त्रिकाल ... -पाहिजे नैवेद्यास रोज एकतरी नित्य नवें कमीत कमी पावशेराचें पक्वान्न पाहिजे. सणावारास त्या त्या सणांचीं पक्वान्नें नैवेद्यास आलीं पाहिजेत. ... असावें. ब्राह्मणानें त्रिकाल स्नान करून पूजा, नैवेद्य, व आरती केली ... पालखी मिरवणूक नेहेमीप्रमाणेंच निघाली पाहिजे. पहाटे काकड आरती व दुपारची पूजा व आरती झाल्याबरोबर एक तास समाधीपुढें गायन झालें पाहिजे. ... -हिजे. पुराणांत वेदांत विषयाखेरीज विषय असूं नये. तास पुराण झालें पाहिजे. ... अमृतानुभव, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, श्री ज्ञानेश्वरी, अशा मान्य मराठी ग्रंथ व भारत भागवत, गीता, उपनिषदें, दासबोध, वगैरे ... योगवासिष्ठ वगैरे संस्कृत ग्रंथ पुराणांत असावे. शारीर भाष्य, पंचदशी, किंवा निदान महिन्यांतून एका एकादशीस तरी मंदिरांत प्रत्येक एकादशीला ... हरि-कीर्तन असावें. पूजारी, पुराणिक, चौघडा व सनई वाजविणारी मंडळी कायमची असावी. पुराणिक व कथेकरी एकच असतील तर फारच उत्तम. मंदिरांत ... घडयाळ व तास असावा. व प्रत्येक तास झाल्याबरोबर तासाचा ठोका पडावा. व ठरलेल्या तासांप्रमाणें ज्यांनीं त्यांनीं आपापली

कामें करावीं. रात्रीची पूजा आरती झाल्यावर दोन तास तरी समाधीपुढे भजन व्हावें. पुराण व रात्रीची पूजा होण्याचे दरम्यान म्हणजे सायंकाळी सुमारें ७ पासून ८ पावेतों समाधीपुढें पुन्हां रोज गायन व्हावें.

य. मंदिरांत राकेलचे दिवे बिलकूल नसावे. गोडयातेलाचे, तूपाचे व णवत्तीचें दिवे असावेत. मंदिरांत हंडया, झुंबरें व श्यामदानें असावीं.

मशीदमाई [illegible]न जी बाबांची धुनी आहे तेथें एक अग्निहोत्र असावें. व कोणत्या तरी [illegible] एखाद्या पण प्रायशः कलाउच्च पिठास जोडून एक मिमांसाशास्त्राचा वर्ग असावा. त्यांत एल् एल् बी होणाऱ्या व एम्. ए होणाऱ्या विद्यार्थ्यास घेत[illegible] जावें. तेथें मिमांसा शास्त्रांचें तात्विक शिक्षण देऊन प्रत्यक्ष व्यवहार अग्निहोत्र शाळेंत शिकवावा. कला उच्चपीठांतच एक कायद्याचा वर्ग ठेवावा. अग्निहोत्र शाळेस जोडून एक गोशाळा असावी गाईचे चाऱ्याकरितां नजीक आसपास कुरणें [illegible] कमीगांची किंवा मोफत कडबा गवत मिळण्याची तजवीज करावी. गो शाळेंत कमी [illegible] जकमी दुभत्या व बिनदुभत्या मिळून १०० तरी गाई असाव्यात.

प्रतिदिवशीं सकाळीं प्रत्येक विद्यार्थ्यानें, शिक्षकानें, अध्यापकानें, व्यवस्थापकानें व नोकर चाकरानें तसेंच सेवेकऱ्यानें व प्रत्येक संस्थेंतील इसमानें श्री गोदावरीचें स्नान करून बाबांच्या समाधीचें दर्शन घेऊन नंतर आपआपले उद्योगास लागावें. प्रत्येक शाळेंत, मंदिरांत, [illegible] पीठांत, व विश्व-विद्यालयांत धार्मिक विषयाकरितां एक तास ठेवावा व त्यांत बाबांच्या चरित्रांचा बराचसा भाग असावा. मठांत व शिवालयांत वेदांत विद्येची चर्चा चालतांना साधुसंतापासून मिळणाऱ्या प्रत्यक्ष पारमार्थिक ज्ञानाची [illegible] बोधाची व त्यांच्या मुखांतून निघणाऱ्या अमोल शब्दाची त्यांच्या अमृत तुल्य बोधाची व त्यांच्या व त्या अनुपमेय व अद्वितीय ऐश्वर्याची व त्यांच्या परमकारूण्याच्या महत्वाच [illegible]ीय लोक संग्र-हाची चर्चा चालावी.

आर्य वैद्यक शाळेस व तसेंच वैद्यक उच्च पीठास जोडून एकेक उपयुक्त वनस्पतींचे बगीचे ( नर्सरीज ) असावें. या शहरीं मल्लशाळा व बाळचमू, विद्यार्थी चमू असाव्या. त्यांनीं संकट व आपत्ती प्रसंगीं शहरवासियांस बाबांचें स्मरण करून सहाय्य करण्यास सदोदीत तयार असावें.

बाबांच्या घोडयाची उत्तम व्यवस्था असावी. मशीद व सभा मंडपांत एक भव्य दरवाजा असावा. कार्तिकाचे महिन्यांत व चैत्राचे महिन्यांत मंदिरांत व मशिदींत दीपोत्साह व्हावेत.

वर लिहिल्याप्रमाणें कित्येक ठिकाणीं कांहीं कांहीं तुटक तुटक व्यवस्था पहाण्यास सांपडतात. पण सर्वांचें एकीकरण पहाण्यास मिळत नाहीं कित्येक ठिकाणीं अलोट पैसाही खर्च केलेला दिसतो. पण तो सर्वांग सुंदर रचनेवर केलेला दिसत नाहीं.

भरपूर पैसा अंतःकरणापासूनची इच्छा, उत्कट भक्ति व बाबांवर निस्सीम प्रेम, विशाल बुद्धि, अपूर्व योजना, मुमुक्षत्व व बाबांच्या कृपेची अनुकूलता इतक्या गोष्टींचा योगायोग मात्र कपिलाषष्ठीचा किंवा कंकणाकृति ग्रहणाचा खरा परंतु महाराजांचे मनांत आल्यावर त्यास उशीर कसला !

"God said let there be light and there was light"

या बायबलांतील म्हणींप्रमाणें किंवा 'एकोहं बहुःस्याम्' या उपनिषदांतील वचनाप्रमाणें बाबांच्या मनांत आलें कीं वर लिहिल्याप्रमाणें व्यवस्था व्हावी कीं ती तावडतोब होईलच. मग तिला कालाची, द्रव्याची व परेच्छेची जरूर लागणार नाहीं. बाबा जरूर त्या गोष्टी तावडतोब निर्माण करतात. हल्लींच्याच मंदिराची गोष्ट घ्या. कै. बापूसाहेब बुट्टी नागपूरचे कोटयाधीश. नागपूर शिरडीपासून किती तरी लांब. बापूसाहेबांचे गुरूही निराळेच. पण बाबांच्या मनांत आलें कीं शिरडीस समाधिकरतां मंदिर असावें ही गोष्ट अगर हें कारण त्यांनीं कधीं कोणास अगर बापूसाहेबांसही सांगि-

तलें नाहीं. पण येथें एक मंदिर बांध इतकेंच त्यांना सांगितलें. व जसें बाबांनीं सांगितलें तसें मंदिर बापूसाहेबांनीं लाख सव्वा लाख रुपये खर्च करून बांधिलें. व शेवटीं त्यांत बाबांनीं आपला देह ठेविला. म्हणून बाबांचेच मनांत आल्यावर माझे वरील विचार खात्रीनेंच अशक्य कोटींतील किंवा काल्पनिक ठरणार नाहींत.

बाबा पूर्ण परब्रह्म होते. म्हणून त्यांचें स्मारक प्रत्येक बाजूनें व्हावयास पाहिजे. बाबा भक्तांस परमार्थाचे धडे देत असत इतकेंच नव्हे तर तो धडा कसा गिरवावा, त्याचा अभ्यास कसा करावा, हें प्रत्यक्ष वर्तनानें दाखवीत असत. बाबा योगेश्वर होते. बाबा यतिचूडामणी होते. बाबा विरक्त सिंह होते. बाबा सच्चिदानंद ज्ञान कैवल्य मूर्ती होते. व ते मुमुक्षुजनांना त्यांच्या अधिकाराप्रमाणें तात्विक बोध करून तें बोधरूपी उदाहरण आपल्या स्वतःच्या वर्मनरूपी कृतीनें सोडवून दाखवीत असत. म्हणून मठ शिवालयें व इतर आश्रम साधुसंतांकरितां, मुमुक्षुजनांकरितां, योग्यांकरितां, संन्याशांकरितां, विरक्तांकरितां व ज्ञानी जनांकरितां बांधून त्यांत सर्व प्रकारें सोय केली म्हणजे तें बाबांचे सुंदर पारमार्थिक स्मारक होईल. बाबांचें मुलांवर फार प्रेम असे. ते लोकांस औषध सांगत असत. येवढ्याकरितां सर्व तऱ्हेची सर्व भाषांची विद्यामंदिरें, विद्यापीठें, उच्चविद्यापीठें व विश्वविद्यालयें, बाल चमू वगैरे स्थापन करून त्यांत त्या विषयाच्या विद्यार्थ्यांस ज्ञानार्जन करतां आलें व त्याच्या जीवितरूपयात्रेची कालानुरूप त्याच्या स्थितीप्रमाणें, त्याचे आवडीप्रमाणें, त्याच्या बुद्धीमतेप्रमाणें त्याचे जवळ सामग्री तयार झाली म्हणजे तें बाबांच्या शिशुप्रेमाचें, वैद्यशास्त्रावरील व निरनिराळ्या भाषांवरील प्रेमाचें स्मारक होईल. बाबांस संस्कृत उत्तम येत होतें. बाबा संस्कृतपंडित होते. ( याबद्दल मी पुढें स्वतंत्ररीतीनें लिहिणार आहें ). बाबा अप्रतिम, सुंदर गायनपटु व गायनप्रेमी व गायनज्ञाते होते. म्हणून संस्कृत पाठशाला, वेदशाळा, गायनशाळा ही त्यांची त्या त्या विषयासंबंधानें स्मारकें होतील. बाबा गोप्रिय होते. त्यांच्या गोष्टींत पुष्कळ वेळां ‘ गौ ’ शब्दांचा उल्लेख

होत असे. म्हणून गौशाळा हें त्यांचे त्यासंबंधाचें स्मारक होईल. शिरडींत लवकरच गंगा येणार आहे, असें बाबा म्हणत असत. म्हणून लेंडीनाल्यांत श्री गोदावरीचा प्रवाह सोडून त्यास घाट बांधण्याची व्यवस्था करणें म्हणजे हें बाबांचे त्यासंबंधाचें स्मारक होईल. बाबा पूर्ण व्यवहारी होते म्हणून शहर रचना आदिकरून ज्या योजना वर दर्शविल्या आहेत त्या बाबांच्या व्यवहारचातुर्याचें स्मारक होतील. बाबांच्या मंदिरावरील शिखर व मनोरे हे त्यांच्या हिंदुमुसलमान जातीवरील समप्रेमाचें स्मारक होईल. अशा तऱ्हेचें हिंदु मुसलमान प्रेम समत्वाचें स्मारक जगांत क्वचित ठिकाणींच पहावयास सांपडेल. किंबहुना नाहींच म्हटल्यास त्यास अपवादच सांपडणें कठीण. एकाच मंदिरांत हिंदुस्थानांतील सर्व देवतांची व तीर्थांची स्थापना हें बाबांच्या विश्वव्यापकतेचें स्मारक होईल. मशीदींत अग्नि, व अग्निहोत्र किंवा अग्यारी मशिदींत हें बाबांच्या हिंदु मुसलमान व पार्शी जातीच्या पूर्ण व समप्रेमाचें वर लिहिल्याप्रमाणें अश्रुतपूर्व व अदृष्टपूर्व स्मारक होईल. या योजनेस अपरिमित द्रव्याची जरूरी आहे हें वर लिहिलेंच आहे. व द्रव्याची सोय झाली म्हणजे योजक व कल्पक ही अपरिमित निघतील. योजना अश्रुतपूर्व नाहींत. कोठें पहिली तर कोठें दुसरी, कोठें तिसरी तर कोठें चवथी पहावयास मिळतात. ( हरिद्वार, काशी, द्वारका, त्र्यंबकेश्वर वगैरे ) फक्त शिरडींत त्यांचें सर्वांचें केंद्रीकरण व्हावें येवढीच इच्छा. गुरुमायेची जशी इच्छा किंवा मर्जी असेल तसें होईल.

## पृथ्वी.

अभेद परि आमुचा असिस तूंच येशू खरा ।
असे वदति ख्रिस्ति गा, कितिक पारसीका नरा ।
तुला म्हणत आमुचा जगति तूंच वैश्वानरा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ १ ॥

इलाइ सब मालिका सुपरवर्दिगारा पिरा।
खुदा कबिर अल्ल हो अकबरा हि पैगंबरा ॥
तुला यवन बोलती वदति हिंदु श्रीशंकरा ॥
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ २ ॥

अभेद:अससी परी अमित भेद ही दाविसी।
अनाम परि नाम गा भुवि असंख्य तूं पावसी ॥
अजाति परि जन्मसि अखिल जाति माजी हरा।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ ३ ॥

अकाय असुनी चराचर शरीरिंगा राहसी।
अमोह परि मग्नसा जगिं भवार्णवीं दाविसी ॥
अबद्ध परि बंधनीं दिससि गुंतला श्रीधरा।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ ४ ॥

अणूहुनि अणूसमा शरिर घेउनी खेळसी।
अपार सुख मानसीं नटसि नाचसी लोळसी ॥
अफाट तनु घेउनी रमसि त्यांत ही सुंदरा।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ ५ ॥

अमूर्त परि येशि गा सकल मूर्त रूपा हरे।
अगा असुनि निर्गुणीं सगुणरूपिं ही संचरे ॥
धरी हृदिं तसाचि तूं सुहृदचित्तिं गौरीवरा।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ ६ ॥

अदूर हि सुदूर गा स्थिर तसाचि तूं धावका।
अखंड शशिशीतला, परम दाहका पावका ॥

अबोल बहुबोल तूं सदय दारुणा निष्ठुरा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ ७ ॥

अमोल बहुमोल तूं कठिण, कंजसा कोमला ।
अशक्तचि सशक्त तूं धवल गौर वा शामला ॥
असूनि सदसत्प्रभो असिसि गा तयाच्या परा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ ८ ॥

असें जग हिं थेंकुलें तुज रमवाया माधवा ।
अगा परि पिपिलिका हृदिं हि क्रीडसी यादवा ॥
अकृत्रिम हि कृत्रिमा, ऋजु कुटील शारङ्धरा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ ९ ॥

अहा अंसित देवला, कवि महामुनी वाल्मिका ।
अगा कपिल व्यास तूं भृगु हि जैमिनी कल्पका ॥
अरुंधति वसिष्ठ तूं चतुर याज्ञवल्क्यांगिरा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ १० ॥

अगा विधि हरी हरा अमरनाथ वैश्वावनरा ।
अगा अनिल भास्करा रजनिनाथ रत्नाकरा ॥
अगा गिरिश्वरा धरा धर असंख्य धाराधरा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ ११ ॥

अगम्य परि गम्य ही वरद संतराया वरा ।
अदृश्य परि दृश्य गा सुभग इंदिरेच्या वरा ॥
अनंत हि दिगंबरा असुनि सांत पीतांबरा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ १२ ॥

अनादि तुज मध्य ना, जनन मध्य ही दाविसी ।
अगा अति अगाध तूं उथळ ही तसा आससी ॥
अमर्त्य असुनी सदा दिससि मर्त्य दामोदरा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ १३ ॥

प्रभो पृथिवि आप तूं प्रखर तेज वायू नभा ।
गुरो पुरुष तूंचि तूं विकृति छत्तिसांची सभा ॥
गुणत्रय स्वतंत्र ना परि तुझा पसारा खरा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ १४ ॥

अगा करण देवता सकल तूंचि ज्ञानेंद्रियें ।
अगा सकल ज्ञान तूं सकल कर्म कर्मेंद्रियें ॥
अगा मनहि बुद्धि तूं करणराजराजेश्वरा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ १५ ॥

भवा चतुर देह तूं चतुर ही अवस्था तशा ।
मुकुंद, मनपंचका, अससि तूं कला षोडशा ॥
विरिंचि कमळासना, चतुर सुंदरा तूं गिरा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ १६ ॥

१. २७ वा पुरुष. २. विकार ३६. ३. समूह. ४. इंद्रिय. ५. इंद्रियांचा राजा मन त्याचा ही राजेश्वर=परमात्मा ६. शंकरा. ७. चार. ८. स्थूल सूक्ष्म, कारण महाकारण. ९. जागृति स्वप्न, शुषुप्ति, तुर्या. १०. मन बुद्धि. चित्त अहंकार, अंतःकरण. ११. प्रश्नोपनिषदांतील ६ वे शिष्यानें विचारलेल्या प्रश्नाचें उत्तरांत पहा. १२. परा. पश्यंती मध्यमा वैखरी.

शरीर शारिरीहि तूं असासि पंचगा प्राण ही ।
कटिस्थित सुसर्पिणी असासि वा उपप्राण ही ॥
अगा भुवन नायका सकल जीव प्राणेश्वरा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ १७ ॥

गुरो चतुर वेद तूं सुखरा उपांगें हि तीं ।
प्रसिद्ध षड दर्शनें रत सदा जनांच्या हितीं ।
पुराण तरि अन्य ना असासि तूंचि गा आठरा ॥
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ १८ ॥

सुरेंद्र, सुर, देवि, तूं तव न नाटका पार गा ।
मृगेंद्र' मृग, तूं मृगी, नर नरेंद्र तूं नार गा ॥
धनि, धनिक, किंकरा, दिससि रंक तूं पामरा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ १९ ॥

चिकित्सक विशालधी सकळ रोग रुग्णौषधी ।
वनस्पति कषाय तूं सकल चूर्ण तूं मंदधी ॥
कटू लवण आम्ल तूं मधुर तिक्त तूं शर्करा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ २० ॥

उदार बहु तूं परी कृपण ना तुझ्या सारखा ।
सखा सतत तूं कुणा परि कुणा सदां पारखा ॥
विलक्षण विचित्र गा श्रुति अगम्य मायेश्वरा ।
अशा तुज नमो नमो विमल साइ गंगाधरा ॥ २१ ॥

---

१. जीव. २. कुंडलिनी ३. नाग. कूर्म, कृकल, देवदत्त, धनंजय.

कर्तुं अकर्तुं अन्याथाकर्तुं जगच्चालकाच्या सगुणनिर्गुत्वाबद्दल अनंत कोटीब्रह्मांडरूपी रंगभूमीवर व अतर्क्य अशा नाटककला विशारदतेबद्दल, त्याच्या अगम्य व अनंत शक्तिसामर्थ्याबद्दल अभिमानानें कोण वर्णन करणार ! अशा त्या श्रीसाइदत्तगुरूंच्या पदारविंदींवरील गद्य व एकविंशति पद्य दलान्वित लहानसें ओबड धोबड वाक्कमल अनन्य भावानें अर्पण करून आपली रजा घेतों.

बाबांचें बाळ

**टीप:—**' बाबांच्या बाळा'च्या वरील कल्पना सकृद्दर्शनी काल्पनिकच वाटणार व त्याची जाणीव त्यांनांही आहे. सूक्ष्म दृष्टीनें विचार केल्यास कोणा-ही साइभक्ताला आपल्या श्रीसद्गुरूंचे स्मारक असेंच व्हावें असें वाटेल. तूर्त मनोराज्यच कां होईना परंतु शेख महंमदाप्रमाणें शेवटीं स्वस्त्रीवर लाथ झाडण्याची पाळी येऊन बाटल्याचा हारा न फुटतां, ह्या गोड मनोराज्यांतून कांहीं तरी फलद्रुप निष्कर्ष खास निघेल. ज्या अदृश्य शक्तीनें हा लेख लिहिण्याची बाबांचे बाळास प्रेरणा दिली. तीच शक्ति कांहीं साइ भक्तांनां त्यांतील आपल्यांला झेपतील अशीं कित्येक लहान मोठीं कामें शिरावर घेऊन पूर्णतेला नेण्याची प्रेरणा करील. " प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तैलही गळे " इतका जाज्वल्य आत्मविश्वास ज्या हिंदुत्वांत भरलेला आहे त्याला प्रयत्न केल्यास काय असाध्य आहे ?

शिरडी हें मुळचें लहानसें खेडेगांव परंतु महाराजांमुळें त्याची कीर्ति दिगंत पसरली. उत्तरेस नेपाळपासून दक्षिणेंत रामेश्वरापर्यंतची मंडळी महाराजांचे दर्शनास येऊन गेली. शिरडीस लहान मोठे वाडे झाले. समाधि-मंदिराप्रमाणें भव्य इमारत तर नगर जिल्ह्यांत क्वचितच दुसरी असेल. शिरडीस लाखों रुपयांची उलाढाल झाली. हें सर्व कोणी केलें ? महाराज तर प्रत्यक्ष कांहीं करीत नसत. **त्यांनीं** "माझ्या दर्शनाला या" म्हणून जाहिराती लाविल्या नाहींत. आपण विद्यमान असतांना स्वतःचें "चरित्र"

पुस्तक रूपानें बाहेर पडूं दिलें नाहीं. अमूक रक्कम खर्च करून वाडे बांधा असें कोणास प्रत्यक्ष सांगितलें नाहीं. आपल्या भक्तांच्या मनांत ते प्रेरणा करीत व त्यांचे पूर्ण निष्ठावंत भक्त त्यांची आज्ञा घेऊन आपापलें काम पुरें करीत. हल्लींच्या समाधिमंदिराचेंच आपण उदाहरण घेऊं. प्रथम श्री. बापूसाहेब बुटीनीं स्वत: राहण्याकरितां एक बेताचें बैठें घर बांधण्याचें ठरविलें. त्या घराचा मोठा वाडा झाला. नंतर त्यांत श्री मुरलीधराचें मंदीर करण्याचें ठरलें. पण शेवटीं मुरलीधराची मूर्ति येण्याऐवजीं महाराजांनीं आपला जड देह तेथें ठेविला. या वाड्याचें **समाधिमंदीर** होईल ही कल्पना प्रत्यक्ष महाराजांचा जड देह तेथें येईपर्यंत कोणालाही नव्हती. पुढें श्री. केशवराव व श्री. पूर्णचंद्र बुटी या बंधुद्वयानीं समाधि संगमखरी केली व सभामंडपांत संगमरवरी फरशी घातली. रा. व्यंकट लिंबाजी कोडळ यांना प्रेरणा होऊन त्यानीं बाजूला संगमखरी फरशी बसविली. कालांतरानें रा. सुंदरराव दीनानाथ नवलकर यांना स्फूर्ति होऊन त्यांनीं समाधीच्या चौथऱ्यावर सुंदर नक्षीचा संगमखरी कठडा बसविला. मिळून सुमारें रु. ३००० चें काम या भक्त मंडळींनी केवळ स्वयंस्फूर्तीनें केलें. आतां उणीव राहिली आहे ती संगमखरी मखर व महाराजांची मूर्ति. त्संबंधीं एखाद्या भक्ताला प्रेरणा होऊन तो हीं कामें हातीं घेईल. मंदीरावर शिखर बांधण्याचें कै. बापूसाहेब बुटी यांचें मनांत फार होतें. कदाचित वडिलांची राहिलेली इच्छा पूर्ण करण्याची त्यां या चिरंजीवांना प्रेरणा होऊन हेंही काम पूर्ण होऊन जाईल.

बाबांच्या बाळानें या दृष्टीनें विचारांना चलन दिलें आहे व त्याला केव्हांना केव्हां तरी मूर्त स्वरूप खास येईल. इंग्रजींत एक म्हण आहे कीं Rome was not built in a day म्हणजे रोम शहर एका दिवसांत बांधलें गेलें नाहीं. एके काळीं रोम शहर अत्यंत सुंदर व पूर्ण भरभराटलें होतें, पण त्याला ती स्थिति एका व्यक्तीनें किंवा एका पिढीनें आणली नव्हती. एका पिढींत कल्पनेचा उगम झाला तर दुसरींत त्या कल्पनांना

मूर्त स्वरूप येऊं लागलें. व कालांतरानें त्या कल्पना पूर्णत्वाला पोहोंचल्या. याला कारण मुख्यत्वें रोमन लोकांचा देशाभिमान रोमशहरावरील अखंड प्रेम व पूर्ण चिकाटी. त्याच स्वाभिमानानें व अखंड प्रेमानें साईभक्त प्रेरीत झाल्यास व त्यांनीं आपल्या पुढील पिढींत त्याचें बीज पेरल्यास कालांतरानें बहुवांशीं बाबांच्या बाळाच्या कल्पनांना मूर्त स्वरूप खास येईल. आज फक्त त्या दिशेनें विचारांना चलन देण्याचा बाबांचे बाळांनीं उपक्रम केला आहे. व भक्त-कामकल्पद्रुम श्री साईनाथ महाराज भक्तांची मनीषा पूर्ण करण्यास समर्थ आहेत.

संपादक

**साइ हो ! तूं येईं वा तूं येईं । भेटी सत्वरी देइ ॥ साइ हो० ॥**

मस्तक तव अंकावरिं ठेवुनि । भाव धरियला पायीं ॥
पुढतीं मज एकाकी त्यजिलें । कोण मजकडे पाही ॥ नाथ हो० ॥
चुकवुनिया मज तूं गेलासी । पत्ता लागत नाहीं ॥
मज शरणागत व्हाया तुजविण । स्थानचि दुसरें नाहीं ॥ तात हो० ॥
मम हृदयीं तूं चोरुनि असतां । लाभ तयाचा कायी ॥
सर्वव्यापी असूनिया तूं । दर्शन मज नाहीं ॥ समर्था तूं० ॥
हंबरडा हो फोडित बाळक । कां करुणा नच येई ॥
साक्षात्कारें उघडुनि दृष्टी : मजला निजपदिं नेई ॥ दयाळा तूं० ॥
दुःखाश्रू मम दुःखद तुजला । नसती कां वा कांहीं ॥
साक्षात्कारावीण मला हो । प्राण नकोसा होई ॥ कृपाळा तूं० ॥
भार तुजवरी टाकुनियां हो । जीव धरुनिया राही ॥
शरणागत नीलकंठ हा बा । त्याची सद्गति नाहीं ॥ वत्सला तूं० ॥

श्रीगणेशाय नमः श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ।
श्रीकुलदेवतायै नमः । श्रीतारामचंद्राभ्यां नमः ।
॥ श्रीसद्गुरुसाईनाथाय नमः ॥

## —श्री गणेशायनमः—

"गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यस्तु छिन्नसंशयः" ह्या वेदान्त शास्त्रो-क्त्यन्वयें श्रीसाईंनीं श्री नाथांच्या " वाचा नेमावी माझे नामें ॥ मन नेमावें ध्यान संभ्रमें ॥ प्राण नेमावा प्राणायामें ॥ इंद्रियें दमनें नेमावी ॥ १ ॥ बुद्धि नेमावी आत्मविवेकें ॥ जीव नेमावा परमात्म सुखें ॥ इतकेनीं तू अवश्यकें ॥ पावसी कौतुकें मद्रूप ॥ २ ॥ " ह्या पूर्वींच माझ्या संग्रहीं असलेल्या भागवतांतर्गत दोन ओव्यांचा मला मौनोपदेश करण्याचा मुद्दाम जो अकस्मात् प्रसंग आणिला, त्याचें हें पुढील वर्णन आहे. मला हा उपदेश करण्यापूर्वींच माझी पूर्ण शरणागति, सेवा, आणि मुमुक्षा (श्री मद्भगवद्गीता ४. ३४) स्थापित करून घेतली होती, ह्यावरून शास्त्राज्ञेला म्हणजे अर्थात् सत्संप्रदायाला संत किती मान देतात, तें सहजच कोणाच्याही लक्षांत येईल.

बकूळ, बडोदें. { नीलकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे

### ॐ श्री सद्गुरु साइनाथाय नमः

साइची ती अगम्य लीला योगारूढा ठावी ॥
तदितर जीवां अधिकाराविण कैशी ती उमजावी ॥ १ ॥

तात्याबाच्या ( १ ) सेवेसाठीं मजला शिर्डीमाजीं ॥
मित्रांकरवीं खेचुनि नेलें नसतां मी हो राजी ॥ २ ॥

त्या सेवेची त्रिवार आज्ञा मज झाली परि कांहीं ॥
त्यांतिल पुढिलें भविष्य कोणा समजुनि आलें नाहीं ॥ ३ ॥

जाण्याची मज ( २ ) आज्ञा व्हावी ऐसें कांहीं दिवशीं ॥
प्रार्थित माधव ( ३ ) असतां साई वदले वाचा ऐशी ॥ ४ ॥

"भानापरि ह्या मशिदिपुढें त्या ( २ ) पडुनि राहूं देई ॥
कार्य तयाचें पुढें असे तें तुजला ठावें नाहीं " ॥ ५ ॥

माधवरावें कळविलि मजला ऐशी आज्ञा जेव्हां ॥
जाण्याचा मी बेत मनांतील रहितचि केला तेव्हां ॥ ६ ॥

थोड्याच दिवसा नंतर तात्याबाला दुखणें आले ॥
सेवा-कार्य-प्रसंग तेव्हां समजुनि संशय गेले ॥ ७ ॥

त्या कुग्रामीं तात्याबाचे पुरते हालचि होते ॥
जरि कां मजला श्री साईनीं तेथें नेलें नसतें ॥ ८ ॥

ऐसें तात्याबाचि स्वयें हो वदले समर्थी एका ॥
तेव्हां अगम्य साईलीला ती कळली हो लोकां ॥ ९ ॥

साई ! तव आज्ञेतें वंदुनि मम मित्राची ( १ ) सेवा ॥
दिन रजनीं म्यां सततचि केली साद्यंतचि हो देवा ॥ १० ॥

तेवी दासगणूची भार्या तिच्याहि सेवे मजला ॥
योजियलें त्वां तीही झाली उत्तम ठावें तुजला ॥ ११ ॥

उपनामावरि ठेवुनि लक्षा स्नुषा तिला मम म्हणसी ॥
काय तुझें हें कौतुक ! सर्वां वेडावुनि तूं असती ॥ १२ ॥

संशय फेडुनि अमितचि माझे, निजपदिं निष्ठा केली ॥
माझी अढळचि, आतां कां हो माया पातळ झाली ॥ १३ ॥

मम त्राता हो तुजविण कोणी नाहीं ऐसें कथिलें ॥
त्वांचि मला रे, तेव्हां तेंही त्रिसत्य कीं मज गमलें ॥ १४ ॥

तेव्हांपासुनि भाव तुझ्या मीं पायीं अखंड धरिला ॥
गुरुरूपें मी आजवरीं हो त्वदन्य नाहीं वरिला ॥ १५ ॥

ह्या उपरीं मी तुजविण कोणा गुरुरूपें नच पाही ॥
पाहिन तरि ही जळोचि दृष्टी जारिणिसम जी होई ॥ १६ ॥

तारी, मारी, किंवा जाळी ह्या देहातें आई ॥
परि मीं तुजला न सोडि आतां ऐसें समजुनि राही ॥ १७ ॥

तव नाम मुखीं ध्यान तुझें हो माझ्या मानसिं राहो ॥
प्राणायामीं प्राण रतूनी पूर्णेंद्रिय जय होवो ॥ १८ ॥

आत्म विवेका बुद्धिमाजीं, परमात्म सुखा जीवीं ॥
ठाव असो, ह्या पंचदशांविण इच्छा मज नच ठेवी ॥ १९ ॥

प्रतिवेळीं दक्षिणा हीच तुं मागितली मज गमतें ॥
पंध्रा रुपयांचे मिष करूनी उगवुनि घेई तीतें ॥ २० ॥

एका समयीं तुज द्यायाला दक्षिणाचि मजपाशीं ॥
नव्हती तेव्हां तूं सांगितलें उसनी आणायासी ॥ २१ ॥

नंतर मजला दीक्षित ( ४ )वदले रुपये नाहिंत द्याया ॥
परंतु पोथी बघतां मिळतिल व्हा कीं राजी घ्याया ॥ २२ ॥

त्यांच्या वचनें शंकित होउनि तसाचि हो तुजपाशीं ॥
गेलों तेव्हां उडवा उडवी त्वां केली मजपाशीं ॥ २३ ॥

नलगे मज दक्षिणाचि आतां, पुढतीं पाहुनि घेऊं ॥
ऐसें म्हणतां तूं, मम मानसिं विचार लागति येऊं ॥ २४ ॥

थोड्या दिवशीं अवलोकी जैं नाथांच्या दों ओव्या ॥
प्रश्न उकलला ! परि नव्हत्या कां पूर्वीं मज त्या ठाव्या ?॥२५॥

अतर्क्य लीला ऐशी करुनी भक्तांना मार्गासी ॥
लाविसि परि अंधाना नुमजे तव करणी जी ऐशी ॥ २६ ॥

देणें घेणें सर्व तुजकडे मी देणारा नाहीं ॥
घेसीना तूं दक्षिणाचि तव तरि मी दोषी नाहीं ॥ २७ ॥

करिसी वा तूं करविसि जें जें त्यांतचि सुख तें माझें ॥
अंतिम आहे हेंचि उमजणें खचितचि मजला साजे ॥ २८ ॥

इतुकें कळुनी अंतरिंची हो तळमळ जातच नाहीं ॥
ती घालविली नाहीं तूं तरि वत्सलता तव कायी ? ॥ २९ ॥

नीलकंठ हा तुझिया द्वारीं तिष्ठत नित्य भिकारी ॥
त्याला सत्वरि शांतीची तूं भिक्षा घालुनि वारी ॥ ३० ॥

॥ ॐतत्सत्साइनाथार्पणमस्तु. ॥

( १ ) कै. वा. श्रीयुत लक्ष्मण कृष्णाजी ऊर्फ तात्यासाहेब नूलकर, बी. ए.; एल् एल्. बी; मुनसफ.

( २ ) ह्या साक्यांचा वक्ता.

( ३ ) शिर्डी येथील साईप्रिय रा. रा. माधव रावजी देशपांडे.

( ४ ) कै. वा. श्रीयुत हरि सीताराम ऊर्फ भाऊसाहेब दीक्षित, सॉलिसिटर, जे. पी., आणि नोटरी पब्लिक.